<u>मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई</u>

<u>गुरुवार दि.२२ / ०१/ २००४ रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.</u>

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९७ वी बैठक गुरुवार दि.२२/१/२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ५. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ६.. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ७. | मा. श्री. रमेश परब | सदस्य |
| ८. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ९. | मा. श्री मोहन देसाई | सदस्य |
| १०. | मा. श्री गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ११. | मा. श्री संजय शिर्के | सदस्य |
| १२. | मा. श्री अबुबकर मुसा बाटलीवाला | सदस्य |
| १३. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |

मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

<u>बाब क्रमांक : ९७ / १</u>

विषय- दि. २२.१२. २००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
९६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ५७ वर सादर करण्यात आला आहे. सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---oXoXo---

बाब क्रमांक : ९७ / २

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(कालावधी दि. १८.१२.२००३ ते १३.१.२००४)

------------

सदर माहिती पृ.क्र.५९ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, नुकताच एका इमारतीला अपघात झाला होता परंतु त्याची माहिती त्यांना किंवा मंडळाच्या सदस्यांना देण्यात आलेली नाही. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली.

उपमुख्य अभियंता/ दक्षिण यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इ.क्र.६० व ६२ उमरखाडी हया दोन इमारतींमधील गल्लीमध्ये एक अनधिकृत बांधकाम (गॅरेज) करण्यात आले होते. हया अनधिकृत बांधकामाचे छत रस्त्यावरील माणसांच्या अंगावर पडले. हया अपघातामध्ये एक व्यक्ती मृत व दोन व्यक्ती जखमी झाल्या. हे अनधिकृत बांधकाम असल्याने त्याचा मंडळाशी संबंध नाही. हया अपघाताचा संदेश मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झाला होता. मात्र हया अपघाताचा संबंध मंडळाशी नसल्याने त्याची महिती कळविण्यात आली नाही.

मुख्य अधिकारी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, नुकतीच एका इमारतीला आग लागली होती. हया घटनेचा संदेश मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांनी दिला होता. हया घटनेचा संदेश मंडळाच्या नियंत्रण कक्षाला दिला गेला नव्हता. तदनंतर हयाबाबत मा. गृहनिर्माण मंत्री हयांनी म.न.पा., अग्निशामन दल व मंडळाच्या संबंधित अधिका-यांबरोबर एक बैठक घेतली. हया बैठकीमध्ये मा. गृहनिर्माण मंत्री हयांनी असे आदेश दिले आहेत की, मुंबई शहरामध्ये होणा-या इमारतींच्या अपघातांची माहिती त्वरित मंडळाच्या नियंत्रण कक्षात देण्यात यावी तसेच हया आगीच्या घटनेची मंडळाच्या नियंत्रण कक्षात न दिल्याने त्याची चौकशी करुन संबंधित अधिका-यांविरुध्द कार्यवाही करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली असून मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण व उपमुख्य अभियंता (दक्षता व गुण नियंत्रण) हयांच्यामार्फत सदर चौकशी केली जाणार आहे.

-----------------------------oo---------------------------

बाब क्रमांक : ९७.३

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००३-२००४ चे
सुधारित व सन २००४-२००५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक
मंजूर करणेबाबत.

-------------------------------

सदर बाब पृ.क्र.६१ ते ६३ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

मा. मुख्य अधिकारी हयांनी मा. सभापती हयांच्या हस्ते दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००३-२००४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २००४-२००५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केले.

सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांच्या अनुषंगाने मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, सन २००३-२००४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक रु. ७०९१.४९ लक्ष शिल्लकीचे असून सन २००४-२००५ चे अ सन २००३-२००४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक रु.९९३.०० लक्ष तुटीचे आहे. शासकीय अंशदान व उपकरापोटी प्राप्त होणारी रक्कम संपूर्ण रु.१६८९९.०० लक्ष २००३=२००४ हयावर्षी प्राप्त न होता ती काही प्रमाणात सन २००४-२००५ हया वर्षी प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे व हया रक्कमेतून सन २००४-२००५ हया वर्षातील तूट भरुन निघेल.

सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, म.न.पा.कडे अद्यापपर्यंत किती थकबाकी आहे ? तदनुषंगाने मुख्य लेखाधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की,म.न.पा.कडून हयावर्षी रु.२५.०० कोटी प्राप्त झाले असून एकूण रु. ८१.६२ कोटी रक्कमेची थकबाकी आहे. ही रक्कम मंडळाकडे जमा करुन घेण्यासाठी म.न.पा.कडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. मंडळाच्या मंजूरीनंतर सदर अंदाजपत्रक प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती सन २००३-२००४ चे सुधारित व सन २००४-२००५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७८५

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००३-२००४ चे रु. १६१८७.१८ लक्ष रक्कमेचे सुधारित व सन २००४-२००५ चे रु. १६९९४.९५ लक्ष रक्कमेचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

--------------------OO--------------------

उत्तर परिमंडळ

बाब क्रमांक : ९७.४ (अ)

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या९५ बैठकीमधील आदेशांचे अनुपालन अहवाल.

........................

सदर अहवाल पृ.क्र.६५ ते ६७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर अनुपालन अहवालाची नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक : ९४.४ (ब)

विषय- सन २००३ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात धोकादायक म्हणून घोषित केलेल्या उत्तर परिमंडळातील इमारतींची सद्यःस्थिती.

...................

सदर माहिती पृ.क्र.६९ ते ८१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

-----------------------------------oo---------------------------

बाब क्रमांक : ९७.४ (क)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

----------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.७१ ते १५९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील ८, फग/द विभागातील १० व फग/ऊ विभागातील १७ अशा एकूण ३५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. पृ.क्र. ७९ वर सादर केलेल्या इ.क्र.११२, कामाठीपूरा, ५वी गल्ली हया इमारतीचे क्षेत्रफळ २२९.९७ चौ.मी.ऐवजी २१५.४६ चौ.मी. असे वाचावे तसेच दुरुस्ती खर्चाचा दर रु. १२२३.८७ चौ.मी.ऐवजी रु. १३०६.३० चौ.मी. वाचण्यात यावा.

सविस्तर चर्चेअंती उत्तर मंडळातील एकूण ३५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७ / ७८६

**उत्तर परिमंडळातील एकूण ३५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

----------------xxxx---------------

<u>बाब क्रमांक : ९७.४ (ड)</u>

विषय- अभ्युदय नगर, काळाचौकी येथील इ.क्र.३४ या इमारतीतील तळ मजल्यावरील कार्यालयातील परिसराचे दुरुस्तीबाबत.

........................

सदर प्रस्ताव पृ.क्र.१६१ ते १६७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / उत्तर विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, अभ्युदय नगर, काळाचौकी येथील इ.क्र.३४ मध्ये तळ मजल्याच्या संपूर्ण भागात मंडळाच्या ई. विभागाचे कार्यालय असून हया तळ मजल्याची स्थिती अतिशय खराब आहे. ब-याचशा ठिकाणच्या गिलाव्याचा भाग पडला असून काही भाग पडण्याच्या स्थितीत आहे. छताच्याही गिलाव्याचा भाग खराब झाला असून लोखंडी सळया उघडया पडून गंजलेल्या आहेत. कार्यालयातील कर्मचा-यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्वरित दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हया दुरुस्तीसाठी अंदाजे रु.१४ लक्ष खर्च अपेक्षित आहे.ही इमारत मुंबई मंडळाच्या ताब्यात असून दुरुस्तीचा खर्च दु.व पु.मंडळाने करावा कि मुंबई मंडळाने करावा हयाबाबत मा. उपाध्यक्ष/प्रा. व मुख्य अभियंता-२/प्रा. हयांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हया प्रस्तावाच्या अनुषंगाने दुरुस्तीचा खर्च उपकराच्या निधीतून करण्याचे आदेश मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांनी दिलेले आहेत. मात्र मुख्य लेखाधिकारी हयांनी असे मत प्रदर्शित केले आहे की, ही इमारत मुंबई मंडळाच्या मालकीची असल्याने दुरुस्तीचा खर्च मुंबई मंडळाने करणे उचित होईल. हयाबाबत दुरुस्तीच्या खर्चाची प्रतिपूर्ती मुंबई मंडळाने दुरुस्ती मंडळास करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव मुंबई मंडळाकडे पाठविला आहे.

मुख्य लेखाधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचे लेखी स्वरुपात मुंबई मंडळाने मान्य करणे आवश्यक आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया प्रकरणी प्रथम मुंबई मंडळाची संमती घेणे आवश्यक वाटते. उपमुख्य अभियंता (पुनर्र) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणी दुरुस्तीचा खर्च उपकराच्या निधीतून करण्याचे व दुरुस्ती त्वरित करण्याचे मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांचे आदेश आहेत.

का.अ./ई. विभाग हयांनी तदनुषांने असे प्रतिपादन केले की, हया कार्यालयातील भागाची त्वरित दुरुस्ती केली नाही तर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.संपूर्ण तळमजल्याचा भाग अतिशय धोकादायक आहे.

मा. सभापवती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी रु. १४.०० लक्ष खर्च करण्यापेक्षा सदर कार्यालय मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतीमध्ये स्थलांतरित करावे. पिंपळेश्वर किंवा अन्य काही पुनर्रचित इमारतीत बांधण्यात आलेले १८०.००

चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे संबंधित इमारतीतील रहिवाशी घेण्यास तयार नाहीत. अशा गाळयांचा उपयोग मंडळाच्या कार्यालयांसाठी करावा. दुरुस्तीसाठी खर्च करण्यापेक्षा दुरुस्ती खर्चाची रक्कम नवीन जागेतील फर्निचर किंवा अन्य कामांसाठी वापरावी.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ई. विभागाचे कार्यालय जरी अन्यत्र स्थलांतरित केले तरी हया इमारतीतील तळ मजल्याच्या भागाची दुरुस्ती करावीच लागणार आहे अन्यथा सदर भाग अतिशय धोकादायक असल्याने केव्हाही पडेल. हया प्रकरणी मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांचे आदेश असल्याने दुरुस्ती खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास मुंबई मंडळ विरोध करणार नाही. हयाबाबत मुंबई मंडळाशी पत्रव्यवयहार करण्यात आलेला आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने मुंबई मंडळाच्या मुख्य अधिका-यांशी चर्चा करण्याचे प्रस्तावित केले.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७८७

**अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई येथील इ.क्र.३४ मधील ई. विभाग कार्यालयीन इमारतीच्या दुरुस्तीच्या रु. १४ लक्ष खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते देण्यात आली. दुरुस्ती खर्चाची प्रतिपूर्ती मुंबई मंडळाने करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव मुंबई मंडळाकडे मंजूरीसाठी त्वरित सादर करण्यात यावा असे आदेश उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांना देण्यात आले.**

--------------------oo----------------

*दक्षिण परिमंडळ :-*

बाब क्रमांक : ९७.५ (अ)

विषय- सन २००३ च्या पावसाळापूर्व पाहणीत धोकादायक म्हणून घोषित केलेल्या दक्षिण परिमंडळातील इमारतींची सद्यस्थिती.

--------------------------

सदर माहिती पृ.क्र.१६९ ते १७५ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

----------------------ooo--------------

बाब क्रमांक : ९७.५ (ब)

विषय- इ.क्र.१३७-१४१दादी अग्यारी लेन हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणेबाबत.

.........................

सदर प्रस्ताव पृ.क्र.१७७ ते १७९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (दक्षिण) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीच्या सुधारित अंदाजपत्रकास रक्कम रु.११,९०,७०३/- ( रु.९६१.०२ प्रति चौ.मी. दराने ) मंडळाच्या दि. २८.५.१९९९ रोजीच्या बैठकीत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून प्रत्यक्ष झालेला खर्च हा रु. १२,२३,२९०/- (रु.९८७.३२ प्रति चौ.मी. दराने) आहे. त्यामुळे सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा अधिक झालेला खर्च हा रु.३२५८७/- आहे. वाढीव झालेला खर्च हा मुख्यत्वे मागील टप्प्याच्या वाढीव खर्चामुळे होत आहे. सदर वाढीव खर्चास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्च रु.१२,२३,२९०/- हया रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७८८

**इ.क्र.१३७-१४१,दादी अग्यारी लेन हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रत्यक्ष झालेल्या रु. १२,२३,२९०/- खर्चास (रु.९८७.३२ प्रति चौ.मी. दराने) सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

----------------oxo----------------

बाब क्रमांक : ९७.५ (क)

विषय- दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.१८१ ते २५७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / दक्षिण विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अ. विभागातील २, ब. विभागातील ७, सी १-२ विभागातील ८, सी ३-४ विभागातील ७, डी-१. विभागातील ३ व डी-२ विभागातील २ अशा एकूण २९ उपकरप्राप्त इमारतींच्या

दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील २९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९७/७८९**

**दक्षिण परिमंडळातील एकूण २९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

------------ooo------------

बाब क्रमांक : ९७.६ (अ)

विषय- ओम चंद्रमोळी वेल्फेअर असोसिएशन, दहिसर (पू) संक्रमण शिबीरातील अनधिकृत ताबेदारांना मान्यता मिळण्याबाबत.

----------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.२५९ ते २७१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी,दु.व पु.मंडळ हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दहिसर (पू) येथील संक्रमण शिबीरातील २२२ गाळयांमध्ये घुसखोर रहात आहेत. मंडळाने घुसखोर व्यक्तींना वेळोवेळी निष्कासित केले होते. परंतु हया संक्रमण शिबीरातील गाळे घेण्यास कोणी तयार नसते. त्यामुळे हे गाळे रिक्त रहात असल्याने हया गाळयांमध्ये वारंवार घुसेखोरी होत आहे. हया घुसखोर व्यक्तींना नियमित करुन सदर गाळे मालकी तत्वावर देण्याबाबत सदर रहिवाशांच्यावतीने श्री. दिलीप धुरीया यांनी प्रस्ताव सादर केला असून मा. आमदार श्री. पी.यु.मेहता हयांनी सदर प्रस्ताव मान्य करण्याची शिफारस केली आहे. सदर बाब ही धोरणात्मक असल्याने त्याबाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, घुसखोर व्यक्तींना अद्यापपर्यंत कधीच नियमित करण्यात आलेले नाही. हा प्रस्ताव जर आपण मान्य केला तर इतर संक्रमण शिबीरातील अनधिकृत गाळेधारकांबाबतही तसाच विचार करावा लागेल. घुसखोर व्यक्तींना नियमित करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. हया उलट त्यांना निष्कासित करणे हाच उपाय आहे. आपण जर अशा रहिवाशांना नियमित केले तर तो पात्र रहिवाशांवर अन्याय करण्यासारखे आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या विविध संक्रमण शिबीरांमध्ये २००० पेक्षा जास्त गाळयांमध्ये घुसखोरी झालेली आहे. दहिसर (पू) संक्रमण

शिबीरातील अनधिकृत रहिवाशांना जर नियमित केले तर इतर संक्रमण शिबीरातील अनधिकृत रहिवाशांनाही नियमित करावे लागेल. कारण येथील रहिवाशांप्रमाणे इतर रहिवाशीही रक्कम भरण्यास तयार आहेत हे गाळे मंडळाचे असताना त्यामध्ये घुसखोरी होऊनही मंडळ त्यांना पाणी पुरवठा करते, विद्युत पुरवठा करते तसेच त्यांची विद्युत देयकेही भरीत आहे. हा प्रकार चुकीचा आहे.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत व इतर सन्मा. सदस्यांनी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्रस्तावात सादर केलेल्या टिप्पणीमध्ये कोणतीही बाब ठामपणे न मांडता मंडळाकडून काय अपेक्षा आहे त्याबाबतचा ठाम प्रस्तावही सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत मंडळाच्या अधिका-यांचे मत काय आहे अशी विचारणा त्यांनी केली. मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया प्रस्तावाबाबत विधी विभागाचे काय मत आहे ?

सहमुख्य अधिकारी,दु.व पु.मंडळ हयांनी असे प्रस्तावित केले की, ज्या बाबी सादर केल्या आहेत ती वस्तुस्थिती असून त्यातील अडचणीही सादर केलेल्या आहेत. हया प्रस्तावाच्या अनुषंगाने विधी विभागाचे अभिप्राय घेण्यात आलेले नाहीत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व इतर सन्मा. सदस्यांनी असे सुचविले की, सदर प्रस्ताव नामंजूर करुन तो प्राधिकरणाकडे सादर करावा.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, मंडळाने नामंजूर केलेला प्रस्ताव प्राधिकरणाकडून मंजूर केला जाणार नाही हयाची दक्षता घेण्यात यावी.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव नामंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९७/७९०**

**ओम चंद्रमोळी वेल्फेअर असोसिएशन, दहिसर (पू) संक्रमण शिबीरातील अनधिकृत ताबेदारांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यात आला.**

----------------०००० ---------------

बाब क्रमांक : ९७.७

विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे भूसंपादनाचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास मान्यता देण्याबाबत.

---

१)अदाम मंझील, २२४-२४६, नागदेवी स्ट्रीट, मुंबई-०३
२) इराणी चाळ, २४,३१,ए,बी व ३१ एच.जी.,दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई.

सदर प्रस्ताव पृ.क्र.२७३ ते २९७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उप अभियंता (सहकार कक्ष) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया दोन्ही प्रस्तावांमध्ये ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची संमती असून सदर प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कलम १०३ (ब) नुसार भूसंपादनाच्या प्रस्तावांना मंजूरी दिल्यानंतर अशा इमारती संबंधित रहिवाशी किंवा मंडळ दुरुस्त किंवा पुनर्रचित करु शकत नाहीत. त्यामुळे संबंधित इमारतीतील रहिवाशांच्या जिवीतास धोका निर्माण होत आहे. हे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयापुढे निर्णयासाठी प्रलंबित असल्याने हया वस्तुस्थितीची कल्पना मा. सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करणे आवश्यक आहे. हयाबाबत मंडळाने मा. सर्वोच्च न्यायालयात कळविले असेल तर त्याची माहिती सादर करण्याचे आदेश मा. सभापती यांनी दिले तसेच अद्याप मा. सर्वोच्च न्यायालयास कळविले नसल्यास पत्राचा मुसदा तयार करुन तो त्यांना दाखविण्यात यावा असेही आदेश मा. सभापती यांनी दिले.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७९१

**म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे खालील दोन प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते देण्यात आली.**

**१) अदाम मंझील, २२४-२४६, नागदेवी स्ट्रीट, मुंबई-०३**
**२) इराणी चाळ, २४,३१,ए,बी व ३१ एच.जी.,दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई.**

-------------oooo-------------

*पुनर्रचना विभाग :-*

<u>बाब क्रमांक : ९७.८ (अ)</u>

विषय- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्रचना योजनांच्या बांधकामांच्या निम्नतम निविदांना स्विकृती देण्याबाबत.
१) इ.क्र.२७,२९,३१, नारियलवाडी, माझगाव, ई.विभाग,
२) इ.क्र.९,डॉ. महेश्वरी रोड व १३-१५, मावजी राठोड रोड, बी.विभाग,
३) इ.क्र.१७५ डी, एम.ए.रोड,भायखळा, ई.विभाग,
४) इ.क्र.१८४-ए, देवी थरमदास वाणी चाळ, जी/एस.विभाग,
५) १०ई, श्रीराम बिल्डिंग, फितवाला रोड, जी/एस.विभाग,

६) इ.क्र.८९-९१,९३-९५-९७, भाऊसाहेब सुर्वे मार्ग आणि
इ.क्र.(३) ५२, उमरखाडी, बी.विभाग.

---

सदर निविदा पृ.क्र.२८९ ते ३२७ वर सादर करण्यात आल्या आहेत.

सदर निविदांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित ६ इमारतींच्या पुनर्बांधणी कामांच्या निविदा प्राप्त झाल्या असून निम्नतम ठेकदारांचा पूर्वी केलेल्या कामांचा पूर्वानुभव लक्षात घेता व त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असल्याने हया निविदा स्विकृत करण्यास हरकत नसावी. हयाबाबत मंडळाने निर्णय घेण्यासाठी सदर निविदा सादर करण्यात आल्या आहेत.

सविस्तर चर्चेअंती सदर निविदा स्विकृत करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७९२

**पुनर्बांधणी कामांच्या ६ निम्नतम निविदा खालीलप्रमाणे स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यास सर्वानुमते अनुमती देण्यात आली.**

| अ.क्र. | पुनर्बांधणी योजनेचा तपशील | निविदा रक्कम (रुपये) | मंजूरी देण्यात आलेल्या निम्नतम ठेकेदाराचे नाव | मंजूरी देण्यात आलेले निविदा अधिक्य |
|---|---|---|---|---|
| १. | इ.क्र.२७,२९,३१, नारियलवाडी, माझगाव, ई.विभाग, | १,०९,६३,७६३ | मे. रवी कॉन्ट्रॅक्टिंग ॲन्ड ट्रेडिंग कं. | १.०० टक्के कमी |
| २. | इ.क्र.९,डॉ. महेश्वरी रोड व १३-१५, मावजी राठोड रोड, बी.विभाग, | १,८७,४८,४०६ | म सुपरस्टार कन्स्ट्रक्शन कं. | ३.३३ टक्के कमी |
| ३. | इ.क्र.१७५-१७७ व १७५ डी, एम.ए.रोड,भायखळा, ई.विभाग, | १,१०,९१,२२४ | मे. सतीश कन्स्ट्रक्शन | ३.५० टक्के कमी |
| ४. | इ.क्र.१८४-ए, देवी धरमदास वाणी चाळ, जी/एस.विभाग, | ७३,८२,९३४ | मे. रवी कॉन्ट्रॅक्टिंग ॲन्ड ट्रेडिंग कं. | १.५० टक्के कमी |
| ५. | १०ई, श्रीराम बिल्डिंग, फितवाला रोड, जी/एस.विभाग, | ५५,९८,८३८ | मे. सोलंकीब्रदर्स | ३.९५ टक्के कमी |
| ६. | इ.क्र.८९-९१,९३-९५-९७, भाऊसाहेब सुर्वे मार्ग आणि इ.क्र.(३) ५२, उमरखाडी, बी.विभाग. | २,००,२८,४२४ | मे.आर.के.माधानी अँड कं. | २०.५७ टक्के कमी |

xoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxo

<u>बाब क्रमांक : ९७.८ (ब)</u>

विषय- इ.क्र.१३६-१५०, शिवदास चापशी मार्ग येथील पुनर्रचित इमारतीस " श्री हनुमान बिल्डिंग " असे नाव देण्यास मंजूरी देण्याबाबत.

.....................

सदर प्रस्ताव पृ.क्र.३२९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी पुनर्रचित इमारतीस " श्री हनुमान बिल्डिंग " हे नाव देण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९७/७९३</u>

**इ.क्र.१३६-१५०, शिवदास चापशी मार्ग हया पुनर्रचित इमारतीस " श्री हनुमान बिल्डिंग " हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

xoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxoxo

<u>बाब क्रमांक : ९७.९</u>

विषय- पुनर्विकास पूर्ण झालेल्या व हाती घेतलेल्या संक्रमण शिबीरांची संक्षिप्त माहिती.

..................

सदर माहिती पृ.क्र.३३१ ते ३३३ वर माहितीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

सदर माहितीची नोंद घेण्यात आली.

-------------------oooo-------------------

<u>बाब क्रमांक : ९७.१०</u>

विषय- मंडळाच्या विविध इमारतीतील ब-याच वर्षापासून रिक्त असलेले निवासी व अनिवासी गाळे खुल्या बाजारभावाने विक्री करणेबाबत.

.....................

सदर प्रस्ताव पृ.क्र.३३५ ते ३३९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातर्फे पुनर्रचित करण्यात आलेल्या २२ इमारतींमधील १४ निवासी गाळे व ३९ अनिवासी गाळे रिक्त आहेत. हे गाळे मागील ८-१० वर्षांपासून रिक्त असून त्यामध्ये घुसखोरी होण्याची शक्यता

नाकारता येणार नाही. त्यामुळे हे गाळे खुल्या बाजारभावाने विक्री करण्याचा प्रस्ताव असून त्यास मंडळाच्या मंजूरीची आवश्यकता आहे.

मा., सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया विषयावर मंडळाच्या मागील बैठकीमध्ये चर्चा करण्यात आलेली आहे. त्यावेळी अशा रिक्त गाळयांची यादी सादर करण्यात येऊन हे गाळे ८-१० वर्षांपासून रिक्त असल्याचे सांगितले गेले होते. हया गाळयांचा आकार वाकडातिकडा असल्याने हे गाळे कोणीही घेण्यास तयार नसल्याचे सांगण्यात आले होते. हया गाळयांच्या खुल्या बाजारातील विक्रीसाठी रु. ३००० ते रु.४००० प्रति चौ.फू. दर आकारला होता. सदर प्रस्तावाच्या चर्चेच्या अनुषंगाने मंडळाने आकारलेले दर जास्त असल्याने ते विकले गेले नसल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे हया गाळयात घुसखोरी होऊ नये म्हणून विक्री दर कमी करुन सुधारित प्रस्ताव सादर केला जाईल असे मागील बैठकीत ठरले होते. परंतु तोच प्रश्न उपस्थित करुन सदर प्रस्ताव फेर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, तत्कालिन मा. सभापती श्री. मधु चव्हाण हयांच्या कालावधीत अशाप्रकारे गाळे विक्री करण्यात आले होते तेव्हा त्यांच्यावर बरीचशी टीका करण्यात आली होती. जसा आता आपला चांगला उद्देश आहे तसाच चांगला उद्देश त्यांचा त्यावेळी असावा. परंतु हे गाळे संबंधित इमारतीतील रहिवाशांना द्यावयाचे वा अन्य रहिवाशांना द्यावयाचे वा बृहतसूचीवरील रहिवाशांना द्यावयाचे हयाबाबत विचार घेणे आवश्यक आहे. तसेच हया गाळयांच्या विक्रीसाठीचा दर आकारताना बाजारभावाचा दर वा बांधकामचा दर आकारावा हयाबाबतही साकल्याने विचार होणे आवश्यक आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया गाळयांच्या विक्रीचा दर हा तांत्रिक समिती स्थापन करुन निश्चित करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु हया दरांस मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. परंतु मा. सभापती हयांनी सूचविल्यानुसार विक्रीचा दर सुधारित करुन सुधारित प्रस्ताव मंडळाच्या बैठकीपुढे सादर केला जाईल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सूचविले की, हे गाळे ज्या दराने बांधण्यात आले त्या दरांनुसार सुधारित प्रस्ताव सादर करणे संयुक्तीक होईल असे वाटते.आताच्या बाजारभावाचा दर व प्रत्यक्ष बांधकामाचा दर हयांची तुलना करुन त्यामधून सर्वमान्य दर आकारुन विक्री होऊ शकते का ? हयाचाही साकल्याने विचार होणे आवश्यक वाटते.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हे गाळे वस्तुतः रिक्त आहेत किंवा नाहीत.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मागील वेळी हा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर केल्यानंतर त्यांनी हया गाळयांची पाहणी केली असून बहुतांश गाळे

परेल, लोअरपरेल, काळाचौकी हया भागातील आहेत. बहुतांश गाळयांना दारे नसून ते उघडेच असल्याचे दिसून आले. हयापैकी काही गाळयांचा उपयोग शेजारील गाळेधारक वा अन्य अनधिकृत रहिवाशी करीत आहेत. सन्मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी सांगितल्यानुसार हे गाळे रिक्त आहेत किंवा नाहीत हयाचीही खातरजमा होणे आवश्यक वाटते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, त्यांचा पूर्वानुभव लक्षात घेता त्यांच्या मतदारसंघात एक साईसागर नावाची इमारत असून हया इमारतीमधील एक गाळा अशाचप्रकारे बंद होता. हया इमारतीमधील एका रहिवाशाने अशी विनंती केली होती की, हा गाळा ते विकत घेण्यास तयार आहेत. त्यानुसार हा गाळा त्या संबंधित रहिवाशास विक्री करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आल्यानंतर असे निदर्शनास आले की, संबंधित गाळा हा त्याच इमारतीतील अंडी विक्रेत्यास विक्री करण्यात आलेला आहे. त्यामुळे हया प्रकरणात साकल्याने विचार करुन निर्णय घेणे आवश्यक वाटते. अशा प्रकरणात जो पहिल्यांदा अशा गाळयांची मागणी करेल अशा व्यक्तीस गाळयाचे वाटप करण्यात यावे. मात्र हे गाळे रिक्त असतीलच अशी शाश्वती देता येणार नाही. जरी सद्यः गाळे रिक्त असले तरी मंडळाच्या पुढील बैठकीपर्यंत भरले जाण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे हया प्रकरणाचा गांभीर्याने विचार करुन निर्णय घेणे आवश्यक वाटते. तसेच विक्रीसाठी जे दर निश्चित करावे लागणार आहेत ते कशाप्रकारे कमी करता येतील हयाबाबतही विचार व्हावा. मंडळाने दर निश्चित केल्यानंतर प्राधिकरण स्तरावर त्यात फेरफार केले जाणार नाहीत हयाचीही ~~दक्षता घेण्यात~~ यावी. वरीलप्रमाणे प्रस्ताव सुधारित करुन तो मंडळाच्या बैठकीपुढे फेरसादर करावा.

----------------oooo---------------

बाब क्रमांक : ९७.११

***मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात सादर करावयाचे प्रस्ताव***

१) विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थेला कार्यालय/कचेरीसाठी एक जागा उपलब्धतेनुसार मिळण्याबाबत.

.................................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतीमधील रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना कार्यालय / कचेरीसाठी एक गाळा

उपलब्धतेनुसार रेडी रिकोनर च्या दराप्रमाणे विकावा असा प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाला आहे. त्यानुसार हा प्रस्ताव मंडळापुढे सादर केला आहे.

मा. सदस्य श्री.विश्वास मोकाशी हयांनी असे प्रतिपादन केले की, सदर प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी. मात्र त्याबाबत स.गृ.नि.संस्थेकडून वचनपत्र घेऊन त्यामध्ये हा गाळा स.गृ.नि.संस्था कोणालाही विकू शकत नाही असे स्पष्टपणे त्यांच्याकडून लिहून घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, स.गृ.नि.संस्थांना कार्यालय/कचेरीसाठी जागा देण्यास हरकत नाही. मात्र रेडी रिकोनरच्या दराप्रमाणे स.गृ.नि.संस्था गाळा विकत घेण्यास तयार होतील किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते. कारण रहिवाशी दहा रुपये सुध्दा देण्यास तयार होत नाहीत असा अनुभव आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण आता ज्या पुनर्रचना योजनांचे नकाशे म.न.पा.कडे मंजूरीसाठी पाठविले त्यामध्ये स.गृ.नि.संस्थाच्या कार्यालयासाठी जागेची/गाळयाची तरतुद केली जात आहे. स.गृ.नि.संस्थेच्या कार्यालयासाठी दिला जाणारा गाळा हा मोफतच द्यावा लागेल त्याची विक्री करता येणार नाही.

उपमुख्य अभियंता (दक्षिण) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जरी हया गाळयाचे क्षेत्रफळ चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये अंतर्भूत नसले तरी त्याच्या बांधकामासाठी खर्च करावा लागत असल्याने बांधकामाचा खर्च स.गृ.नि.संस्थेकडून घ्यावा लागेल.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,सर्व रहिवाशांना आपण मोफत घरे देत आहोत. त्यामुळे स.गृ.नि.संस्थेच्या कार्यालयासाठी दिला जाणारा गाळाही मोफत द्यावा लागेल. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नवीन इमारतीमध्ये स.गृ.नि.संस्थेच्या कार्यालयासाठी जागेची तरतुद करणे बंधनकारक केले आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत सुधारित प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये रेडी रिकोनरच्या दराप्रमाणे दर न आकारता तसेच असा गाळा मोफत न देता बांधकामाच्या प्रत्यक्ष खर्चानुसार रक्कम आकारावी किंवा कसे हयाबाबत विचार होणे आवश्यक आहे. तसेच स.गृ.नि.संस्थांना कार्यालयासाठी गाळा देताना तो कोणत्या अटी व शर्तीवर द्यावा हयाचाही प्रस्तावात उल्लेख असणे आवश्यक आहे. हयाप्रमाणे प्रस्ताव सुधारित करुन त्याबाबत निर्णय घेणे संयुक्तिक होईल.

सविस्तर चर्चेअंती वरीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव करुन तो मंडळाच्या पुढील बैठकीपुढे सादर करण्याचे ठरले.

------------------------xxxx------------------------

२) विषय- पुनर्रचित इमारतीमधील मालकी तत्वावरील मोफत २२५ चौ.फू. सदनिकेचे वितरण झाल्यानंतर विक्री केलेल्या सदनिकेचे, नियमितीकरण करण्याबाबत.

..............................

सदर विषय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, आपण सद्यः मालकी तत्वावर इमारतींचे हस्तांतरण करीत आहोत. काही इमारती त्यानुसार मालकी हक्काने हस्तांतरित केलेल्या आहेत. परंतु अद्याप सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झालेल्या नाहीत. अशा इमारतीतील काही गाळेधारकांनी त्यांचे गाळे विकलेले आहेत. त्यामुळे अशा गाळयांचे नियमितीकरण मंडळाने करावे की, सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थांनी करावे हयाबाबत मागील बैठकीत ठरल्यानुसार निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आतापर्यंत आपण ५७१ निवासी गाळे व ५५ अनिवासी गाळे असे एकूण ६२६ गाळे मालकी हक्काने दिलेले आहेत. हयापैकी ८० व्यक्तींनी मंडळाकडे, त्यांचे गाळे नियमित करुन देण्यासाठी अर्ज केलेले आहेत. हया रहिवाशांची अद्याप सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झालेली नसून ती सद्यः नियोजित आहे. रहिवाशांची अशी मागणी आहे की, मंडळाने नियमितीकरण करुन द्यावे परंतु मंडळाची जी नियमितीकरणाची फी आहे ती भरण्याची रहिवाशांची तयारी नाही. सहकारी गृहनिर्माण संस्थेने नियमितीकरण केल्यास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अधिनियमानुसार रु. २५,०००/- फी नियमितीकरणासाठी द्यावी लागेल. मंडळाने जर नियमितीकरण केले तर मंडळाला रु. २७.०० लक्ष उत्पन्न मिळेल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील रहिवाशांचे नियमितीकरण मंडळानेच केले असून त्यामुळे मंडळाला आर्थिक फायदा झाला होता. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होईपर्यंत मंडळानेच नियमितीकरण करणे योग्य होईल. मात्र नियमितीकरण केलेला रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सभासद होईल अशी अट नियमितीकरणावेळी घालणे आवश्यक राहील. तसेच मंडळाने नियमितीकरण केल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होईल हयाचीही दक्षता घेणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत गिरगाव येथील विजयश्री हया पुनर्रचित इमारतीबाबत चर्चा झाली होती. हया इमारतीतील रहिवाशांनी नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली असून ही संस्था अद्याप नोंदणीकृत झालेली नाही. हया इमारतीतील रहिवाशांचे असे म्हणणे आह की, मंडळाने जर रहिवाशांचे

नियमितीकरण केले तर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उत्पन्न बुडेल व त्यामुळे इमारतीच्या देखभालीचा खर्च भागविणे सहकारी गृहनिर्माण संस्थेस कठीण होईल. त्यामुळे हया इमारतीतील रहिवाशांची अशी मागणी आहे की, मंडळाने रहिवाशांचे नियमितीकरण करु नये. सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्यानंतर सदर सहकारी गृहनिर्माण संस्था नियमानुसार नियमितीकरण करणे. प्रत्येक इमारतीमध्ये २५ ते ५० टक्के रहिवाशी त्यांचे गाळे विकतात. अशा गाळयांचे नियमितीकरण जर मंडळाने केले तर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आर्थिक उत्पन्न बुडून पुढील १० वर्षे तरी सहकारी गृहनिर्माण संस्था इमारतीच्या देखभालीचा खर्च सोसू शकणार नाही. हयामुळे मागील बैठकीत असे ठरले होते की, मंडळाने रहिवाशांचे नियमितीकरण थांबवावे. ज्यावेळी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होईल त्यावेळी सहकारी गृहनिर्माण संस्थेने नियमितीकरण करावे असे मत मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी व्यक्त केले.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशांचे नियमितीकरण सहकारी गृहनिर्माण संस्थेने करण्यास हरकत नाही. मात्र सहकारी गृहनिर्माण संस्था किती कालावधीत नोंदणीकृत होईल हयाबाबत कालमर्यादा असणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे जर सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झाली नाही तर नियमितीकरण थांबविणे योग्य होणार नाही.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सहकारी गृहनिर्माण संस्था जोपर्यंत नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत मंडळाने नियमितीकरण करावे व हया नियमितीकरणातून मंडळाला प्राप्त होणा-या रक्कमेपैकी काही रक्कम मंडळाने सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेस द्यावी. मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत व इतर सन्मा सदस्यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाकडे रक्कम जमा झाल्यानंतर ती सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीसाठी उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था हयांच्याकडे अर्ज करतात त्यावेळी सहकारी गृहनिर्माण संस्था किती कालावधीत नोंदणीकृत होईल हयाची माहिती उप निबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था हयांच्याकडून घ्यावी. सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होण्यास जो विलंब होतो तो रहिवाशांच्या अडचणींमुळे होत असतो. काही मुळ रहिवाशी त्यांचे गाळे विकून गेल्यामुळे अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था लवकरात लवकर कशी नोंदणीकृत होईल याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, विजयश्री हया पुनर्रचित इमारतीमधील ९ रहिवाशांनी गाळे विकले आहेत. त्यामुळे नियमितीकरण किती दिवस प्रलंबित ठेवावे हा मुद्दा उपस्थित होतो. जसजसा विलंब होत जाईल तसतसे जास्तीत जास्त मुळ रहिवाशी त्यांचे विकू

लागतील. हयामुळे तदनंतर सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होण्यामध्ये अडचणी निर्माण होऊ लागतील.

मा. सभापती हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, विजयश्री हया पुनर्रचित इमारतीमधील रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होण्यामध्ये काय अडचणी आहेत. उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था हयांच्या कार्यालयाकडून सोसायटी नोंदणीकृत होण्यास विलंब होतो का ?

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सोसायटी नोंदणीकृत होण्यास उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था कार्यालयाकडून विलंब होत नाही. रहिवाशी बदलांमुळेच सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करताना अडचणी निर्माण होतात व त्यामुळेच विलंब होतो.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होण्यामध्ये सभासद व जमिनीची मालकी हया दोन गोष्टी विलंब होण्यास कारणीभूत आहेत. जोपर्यंत जमिनीची मालकीची कागदपत्रे प्राप्त होत नाहीत तोपर्यंत संस्था नोंदणीकृत होऊ शकत नाही. आपण, जमिन मालकी तत्वाने व भाडेपट्टा तत्वाने सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावाने देणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण आतापर्यंत १३ पुनर्रचित इमारतीतील गाळयांचे वाटप मालकी तत्वावर केले आहे. परंतु हया इमारतीतील रहिवाशी पुढाकार घेत नसल्याने त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झालेल्या नाहीत. येत्या एक-दीड वर्षात जर सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झाल्या नाहीत तर पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींबाबत ज्या अडचणी निर्माण झाल्या त्या अडचणी याही इमारतींबाबत निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशी जर सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन नोंदणीकृत करण्यासाठी पुढाकार घेत नसतील तर आपण त्यांच्याकडे सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करण्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. हया सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होण्यामध्ये ज्या काही अडचणी आहेत अशा प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील अडचणींचा साकल्याने विचार करुन निर्णय घेणे संयुक्तिक होईल असे वाटते.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत जेव्हा मागील बैठकीत चर्चा झाली होती त्यावेळी असे ठरले होते की, जोपर्यंत रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत पुनर्रचित इमारतीतील गाळयांचे वाटप करु नये. सुमारे दीड वर्षापूर्वी गाळयांचे वाटप करुनही अद्याप सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झालेल्या

नाहीत. सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे आपण उपमुख्य अधिकारी, स. गृ.नि.संस्था कक्ष हयांच्या कार्यालयाकडे पाठविली आहेत. मात्र सध्या स. गृ.नि.संस्था कक्ष हया पदावर अधिका-याची नेमणूक झालेली नसल्याने पुढील कार्यवाही स्थगित आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अधिकारी, स. गृ.नि.संस्था कक्ष हया पदाचा अतिरिक्त कार्यभार मिळकत व्यवस्थापक श्री. पाडवी हयांच्याकडे सोपविला आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अधिकारी, स. गृ.नि.संस्था कक्ष हयांनी सहकारी संस्था लवकरात लवकर नोंदणीकृत करण्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्याठिकाणी मालकीची कागदपत्रे व सभासदांची नावांमध्ये अडचणी नाहीत त्या प्रकरणांमध्ये उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी सांगितल्यानुसार स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्यामध्ये अडचणी उदभवणार नाहीत.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ९० टक्के गाळयांचे वाटप झाल्यास स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्यास कोणीही पुढाकार घेणार नाही. त्यामुळे गाळयांचे वाटप करण्यापूर्वीच स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करणे रहिवाशांवर बंधनकारक करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र म.न.पा.कडून प्राप्त करुन घेण्यापूर्वीच रहिवाशांना स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करुन घेण्याविषयी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, नवीन बांधल्या जाणा-या इमारतीचे भूमिपूजन केल्यानंतर लगेच स.गृ.नि.संस्था नोंदणीकृत करुन घेण्याची कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे जेणेकरुन इमारत बांधून झाल्यानंतर गाळे वाटपापूर्वीच रहिवाशांची स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत होईल व गाळे वाटपाचे काम मंडळाने करण्याऐवजी सदर काम स. गृ.नि.संस्थेनेच करावे. हयाबाबत परिपत्रक किंवा मार्गदर्शक सूचना अगोदरच निर्गमित करणे आवश्यक आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, नवीन रहिवाशांचे नियमितीकरण केले नाही तर स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करताना त्यामध्ये नवीन रहिवाशाचे नाव सभासद म्हणून समाविष्ट न होता मुळ रहिवाशाचे नाव सभासद म्हणून नोंदले जाईल. कदाचित यामुळे स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत होणार नाही. अद्याप मुळ रहिवाशांनी जर गाळे विकले नसतील तर त्यांच्याबाबतीत सुधारित प्रणालीनुसार कार्यवाही केली जाऊ शकते. मात्र ज्या मुळ रहिवाशांनी अगोदरच गाळे विकले आहेत त्यांच्याबाबतीत नियमितीकरण हे मंडळानेच करणे हे मंडळाच्या तसेच

स. गृ.नि.संस्थेच्या हिताचे आहे. जर मंडळाने नियमितीकरण केले नाही तर सभासदांच्या यादीमध्ये नवीन रहिवाशांची नावे नसल्याने स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करताना अडचणी निर्माण होतील. मुळ रहिवाशांची नावे सभासद म्हणून नोंदवून स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत केल्यास नवीन रहिवाशांना नियमित करताना स. गृ.नि.संस्थेचे अधिकारी अशा नवीन रहिवाशांना आर्थिक तसेच मानसिक त्रास देण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत होईपर्यंत रहिवाशांचे नियमितीकरण मंडळानेच करावे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जोपर्यंत स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत संबंधित इमारत मंडळाच्या मालकीची असते. त्यामुळे अशा इमारतीपासून प्राप्त होणा-या आर्थिक उत्पन्नावर मंडळाचा अधिकार राहतो. स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर अशा इमारतीच्या आर्थिक उत्पन्नावर स. गृ.नि.संस्थेचा हक्क असतो. स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्यासाठी एक ठराविक कालमर्यादा सहा महिन्यांपर्यंत देण्यात यावी. तोपर्यंत मंडळाने नियमितीकरण करु नये. मात्र विहित कालावधीत जर स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत झाली नाही तर मंडळाने नियमितीकरण करावे असे मत मा. सभापती हयांनी व्यक्त केले. सहमुख्य अधिकारी हयांनी या मताशी सहमती दर्शविली.

मा. सभापती हयांनी तदनंतर विजयश्री हया इमारतीतील रहिवाशांना सभागृहामध्ये बोलावून चर्चा केली. रहिवाशांनी सांगितल्यानुसार त्यांनी स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्यासाठी उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांच्याकडे प्रस्ताव सादर केला असून त्यांनी रहिवाशांच्या यादीची मागणी उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांच्याकडून मागविली आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाचे अधिका-यांनी जर आवश्यक कागदपत्रे वेळच्यावेळी उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांच्याकडे सादर केली नाहीत तर ठराविक कालमर्यादेत स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्याचे रहिवाशांवर बंधनकारक करणे योग्य होणार नाही. हयाबाबत रहिवाशांची यादी त्वरित उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांना पाठविण्याच्या सूचना मा. सभापती हयांनी उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांना दिल्या. तसेच विजयश्री इमारतीतील रहिवाशांना त्यांनी अशी विनंती केली की, रहिवाशांची यादी उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांना प्राप्त झाल्यानंतर स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्यास किती कालावधी लागेल, स. गृ.नि.संस्था नोंदणीकृत करण्याची पध्दती काय आहे हयाबाबतची माहिती त्यांनी उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांच्याशी चर्चा करुन मंडळास द्यावी. ही माहिती उपमुख्य अधिकारी (पु.गा.) व (स.सं.कक्ष) हयांनीही उप निबंधक, स. गृ.नि.संस्था हयांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती मंडळापुढे सादर करावी जेणेकरुन हया प्रकरणी चर्चा करुन निर्णय घेणे सुलभ होईल.

---------------------------xx---------------------------

३) विषय- इ.क्र. १-२-३, मानाजी राजूजी चाळ, स्टँडर्ड मिल लेन, ग/दविभाग, मुंबई हया पुनर्रचित इमारतीच्या प्रवेशव्दाराचे व उदवाहनासमोरील भागाच्या सुशोभिकरणाबाबत.

......................

सदर विषय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत हया प्रस्तावावर चर्चा करण्यात आली असून हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या प्रवेशव्दाराचे व उदवाहनासमोरील भागाचे जे सुशोभिकरण करण्यात आले आहे त्यासाठी झालेल्या वाढीव खर्चास मंडळाने तत्वतः मंजूरी दिली आहे. हया सुशोभिकरणाच्या कामासाठी रु.२.०० लक्ष (अंदाजे) वाढीव खर्च झाला असून त्यास मंडळाच्या मंजूरीसाठी हा प्रस्ताव सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९७/७९४</u>

**इ.क्र.१-२-३, मानाजी राजूजी चाळ, स्टँडर्ड मिल लेन, ग/दविभाग, मुंबई हया पुनर्रचित इमारतीच्या प्रवेशव्दाराच्या व उदवाहनासमोरील भागाच्या सुशोभिकरणाच्या वाढीव रु.२.०० लक्ष (अंदाजे) खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

---------xx---------

४) विषय- दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध कामांच्या निविदा मागविताना अंदाजित निविदा रक्कमेपेक्षा असामान्यतः कमी निविदा दर भरणा-या ठेकेदारांकडून घ्यावयाच्या सुरक्षा अनामत रक्कमेबाबत.

.....................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, म.न.पा. च्या कामामध्ये निविदा रक्कमेपेक्षा कमी दर भरणा-या ठेकेदारांकडून म.न.पा. अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरुन घेतली जाते. त्याच पध्दतीनुसार दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामांमध्ये जर निविदा रक्कमेपेक्षा कमी दर भरला असेल तर अशा निविदाधारकांकडून अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरुन घेण्याचा हा प्रस्ताव आहे. त्यानुसार निविदा रक्कमेपेक्षा १२ टक्के पर्यंत कमी दर भरला असेल तर त्यासाठी निविदा रक्कमेच्या १० टक्के सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन

घ्यावयाची व जर निविदेचा दर हा १२ टक्क्यापेक्षाही जास्त कमी भरला असेल तर १२ टक्केपर्यंतच्या फरकाच्या टक्केवारीप्रमाणे होणा-या निविदेच्या रक्कमेच्या तिप्पट अधिक निविदा रक्कमेच्या १० टक्के सुरक्षा अनामत रक्कम भरुन घ्यावयाची. अशाप्रकारे येणारी रक्कम ५ टक्क्यापेक्षा कमी असेल तर ५ टक्क्यानुसार येणारी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. हया सुरक्षा अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट किंवा निविदा सादर करतानाच द्यावा लागेल अन्यथा निविदा ग्राहय धरली जाणार नाही. हया रक्कमेवर मंडळाकडून कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी हा अतिशय चांगला प्रस्ताव सादर केल्याने अभिनंदन केले.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, काम पूर्ण झाल्यानंतर ठेवावयाचा डिफेक्ट लायबिलिटी पिरियडमध्येही वाढ करणे आवश्यक आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ' डिफेक्ट लायबिलिटी पिरियड ' ३ वर्षापर्यंत वाढविण्याच्यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. सद्यः हा कालावधी एक वर्षाचा आहे. पुनर्रचित इमारत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ताब्यात दिल्यानंतर विहित मुदतीत मंडळाने दुरुस्ती करण्यापेक्षा दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर टाकणे संयुक्तिक होईल.

मुख्य लेखाधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सुरक्षा अनामत रक्कमेमधील प्रस्तावित वाढ ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीला धरुन नसल्यामुळे हया प्रस्तावित वाढीस प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी लागेल.

सविसतर चर्चेअंती सुरक्षा अनामत रक्कमेच्या वाढीचा प्रस्ताव तसेच ' डिफेक्ट लायबिलिटी पिरियड' ३ वर्षापर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ९७/७९५

**दुरुस्ती व पुनर्रचनेच्या कामांमध्ये निविदा रक्कमेपेक्षा कमी दर भरला गेला तर अशा निविदाधारकांकडून घ्यावयाच्या अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेचा प्रस्ताव तसेच ' डिफेक्ट लायबिलिटी पिरियड ' ३ वर्षांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. याबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी प्राधिकरणाकडे पाठपुरावा असे ठरले.**

---xx---

५) विषय- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

...........................

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील १३ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१) भुकर पहाणी क्र.१०८०,मांडवी विभाग, विभाग क्र. बी-१०४० ० १०४१, इ.क्र.४५ व ४७, इब्राहिम मोहंमद मर्चंट रोड, मुंबई येथील "मदिना मंझील " हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पहाणी क्र.२३७, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३७३३ (१), ३७३३ (२) ३७३३ (३) इ.क्र.२५१-२५१ए, २५३ बी, २५१ सी, मौलाना आझाद रोड, भायखळा,मुंबई येथील "सत्तार मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३) भुकर पहाणी क्र.३१२/१० माटुंगा विभाग, विभाग क्र. एफ.एन.७५२२ (२), इ.क्र.९, हिन्दू कॉलनी रोड न १०, (तेलंग क्रॉस रोड नं.२ व ४), माटुंगा,मुंबई येथील " गोपाळ भुवन" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

४) भुकर पहाणी क्र.८८०,फोर्ट विभाग, विभाग क्र.ए-२४६८, इ.क्र.४२, मारुती लेन,मुंबई येथील "मोहम्मद सालेह बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

५) अंतिम भूखंड क्र.९९३,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३१०३ (३),इ.क्र.२४-२४बी, काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर,मुंबई येथील " भागीरथी भवन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

६) भुकर पहाणी क्र., ४३४०-४३४१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-७९४६ व ७९४७, इ.क्र.९-१५ व १७-२१, बाप्टी रोड, सी.विभाग, मुंबई येथील " अहमद मंझील व बु-हाणी मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७) भुकर पहाणी क्र.६/१८७६, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-४१३९ (३), इ.क्र.११, डॉ.ए.एन. रोड ,मुंबई येथील " कपाडीया मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८) भुकर पहाणी क्र.१०९८, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३७२, इ.क्र.५२-५४, खांदिया स्ट्रीट,मुंबई येथील "मिट्टीवाला चाळ " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

९) भुकर पहाणी क्र.४९६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.३५,(उत्तर) दादर माटुंगा इस्टेट विभाग, विभाग क्र. एफ.एन.७९५९ (७), इ.क्र.२४, हिन्दू कॉलनी,रोड नं.१९/सी, माटुंगा, मुंबई येथील " ग्रिसेल्डा हाऊस" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१०) भुकर पहाणी क्र.५०/७४,परेल शिवडी विभाग, विभाग क्र..एफ.एस.५४५ (१), इ.क्र.३८५ सी, डॉ. बी.ए.रोड, गणेश गल्ली, लालबाग, मुंबई येथील " रंगवाला बिल्डिंग " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र., २४०१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५३०८ इ.क्र.२८,पहिला भोईवाडा, मुंबई येथील चुनीलाल बलदेवदास बिल्डिंग हया नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२) भुकर पहाणी क्र.१३०३ (भाग), लोअरपरेल विभाग,(१०१८८.४० चौ.मी.),अंतिम भूखंड क्र. ५८० (भाग), नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग क्र.जीएन- ३४६४ (१)(२)(३)(४)(५)(६), ३४६५ (१)(२), ३४६६ (१) व (२) इ.क्र.१, १ए, १बी, १सी, ३सी, ३डी, ५ए, ५बी, सयानी रोड, व १५बी, २७ एलफिन्स्टन रोड,काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर, मुंबई येथील " लोकमान्य नगर" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३) भुकर पहाणी क्र.५४८, मलबार कंबाला हिल विभाग, विभाग क्र.डी-२८८१ (९), इ.क्र.५, तेजपाल रोड, गावदेवी, मुंबई येथील " हरी भवन" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१४) भुकर पहाणी क्र.२०९,परेल शिवडी विभाग, इ.क्र.१४, १४ए,१६,१६ई, १८, १२एच, १२जे, १२जी, १२एफ, १२के, १२ई, १२एल, १२डी, १२सी, १२बी, १२ए व १२, ठोकरसी जिवराज रोड, मुंबई येथील " रावजी सोजपाल कंपाऊंड " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सचिव हयांनी असे प्रतिपादन केले की, अ.क्र.४ वर नमूद करण्यात आलेल्या भू.पा.क्र.८८०, फोर्ट विभाग, इ.क्र.४२-४४, मारुती लेन, मोहमद सालेह बिल्डिंग ही इमारत सुमारे २० वर्षांपूर्वी पडलेली आहे. हया इमारतीमध्ये सकृतदर्शनी १५ रहिवाशी असल्याचे दिसून येते. मात्र का.अ./अ.विभाग हयांनी त्यावेळी २४ रहिवाशांना व्हेकेशन नोटीस दिल्याचे दिसते. उपलब्ध कागदपत्रांनुसार हया इमारतीत १५ रहिवाशी असल्याचे दिसून येते. मंडळाने काही रहिवाशांना संक्रमण शिबीरात तसेच काही रहिवाशांना पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप केलेले आहेत. हया इमारतीतील ५ रहिवाशांचा ठावठिकाणा उपलब्ध नसल्याने हया रहिवाशांसाठी नवीन इमारतीत

बांधले जाणारे ५ गाळे तसेच २ रहिवाशांना मंडळाने पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप केले असल्याने त्यांच्यासाठी नवीन इमारतीत बांधले जाणारे २ असे एकूण ७ गाळे मंडळाच्या ताब्यात घ्यावयाचे प्रस्तावित केले आहे. रहिवाशांचा ठावठिकाणा उपलब्ध नसल्याने त्यांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे नसल्याने ७० टक्के रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे प्राप्त करता आलेली नाहीत. मुख्य अधिकारी हयांनी तदनुषांने असे प्रतिपादन केले की, उपलब्ध १० रहिवाशांपैकी २ रहिवाशांना मंडळाने अन्य पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप केलेले आहे. उर्वरित ८ रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर केलेली आहेत.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ही इमारत २०-२५ वर्षांपूर्वीची असल्याने त्यामधील रहिवाशांबाबतही माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकरणात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया पूर्वीच्या मंडळापुढे अशी प्रकरणे सादर केली गेली असतीलच. आपण हयापूर्वी असे ठरविले आहे की, इमारतीतील रहिवाशांचा ठावठिकाणा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रहिवाशांची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याबाबतच्या हरकती मागविण्यात याव्यात व १५ दिवसांच्या मुदतीत आक्षेप/हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर त्यानुसार निर्णय घेण्यात यावा.त्यामुळे माहिती उपलब्ध नसलेल्या अशा प्रकरणांबाबत एक सविस्तर प्रस्ताव स्वतंत्ररित्या तयार करुन मंडळापुढे सादर करावा जेणेकरुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेता येईल. विशिष्ट प्रकरण आयत्यावेळी सादर करुन त्याबाबत चर्चा करता येणार नाही. एक सर्वसाधारण प्रस्ताव तयार करुन तो नियमित कार्यसूचीत समाविष्ट करुन मंडळापुढे सादर करावा जेणेकरुन त्याबाबत धोरण निश्चित करता येईल.

नि.का.अ. तथा सचिव हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव विधी विभागाकडे अभिप्रायांसाठी पाठविला होता. विधी विभागाने तदनुषंगाने असे मत प्रदर्शित केले आहे की, हा प्रस्ताव मंडळापुढे सादर करुन नंतर तो त्यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठवावा.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावाबाबत विधी विभागाचे अभिप्राय घेऊन त्यानुसार ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करावी.

नि.का.अ. तथा सचिव हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, अ.क्र.५वर नमूद केलेल्या अंतिम भूखंड क्र.९९३ नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग येथील इ.क्र.२४-२४बी, काकासाहेब गाडगीळ मार्ग, भागीरथी भुवन नावाने ओळखल्या इमारतीची पुनर्रचना योजना मंडळाने हाती घेतली असून म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (३) व (४) नुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. पूर्वीच ७० टक्क्यापेक्षा रहिवाशांनी अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर केली होती. परंतु तदनंतर काही रहिवाशांनी संमतीपत्रे मागे घेऊन घेऊन मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. मा. उच्च

न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार हयाप्रकरणी मुख्य अधिकारी हयांनी अर्जदार व संबंधित रहिवाशांची सुनावणी घेतली होती. हया सुनावणीच्या वेळी त्यांना असे स्पष्ट करण्यात आले होते की, एकदा दिलेली अपरिवर्तनीय संमतीपत्रे मागे घेता येणार नाहीत. परंतु हया प्रस्तावात दोन सहमालमत्ताधारकांची परवानगी त्यावेळी नसल्याने पुनर्विकासाचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला होता व भविष्यात जर दोन सहमालमत्ताधारकांनी संमती दिली तर नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा विचार होईल असे अर्जदारास कळविले होते. हया निर्णयाविरुध्द रहिवाशांनी मा. उच्च न्यायालयात कन्टेम्पट पिटिशन दाखल केले होते. परंतु हयामध्ये कोर्टाचा अवमान न झाल्याने कन्टेम्पट पिटिशन फेटाळण्यात आले. मा. उच्च न्यायालयाचे हया कन्टेम्पट पिटिशनचे आदेश सभागृहात वाचून दाखविले. आता अर्जदारांनी दोन सहमालमत्ताधारकांची संमतीपत्रे सादर केली आहेत. विधी विभागाच्या अभिप्रायांनुसार हया प्रकरणी पूर्वी ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर केली असल्याने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नाही असे पूर्वीच कळविले आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया मालमत्तेच्या भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांनी काढलेल्या परिपत्रकानुसार भूसंपादित मालमत्तांच्या पुनर्विकासासाठी त्यांच्या परवानगीशिवाय ना.ह.प्र.पत्र देण्यात येऊ नये असे आदेश आहेत. त्यामुळे व जरी हया मालमत्तेच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नसली तरी हा प्रस्ताव वस्तुस्थितीसह मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांच्या समितीसाठी पाठविण्याचे प्रस्तावित आहे. मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या संमतीनंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाईल. हयास मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांनी संमती दिली.

नि.का.अ. तथा सचिव हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, अ.क्र.११ वर सादर केलेल्या भू.पा.क्र.२४०१, भुलेश्वर विभाग येथील इ.क्र.२८, १ला भोईवाडा ही इमारत संपूर्णतः पाडलेली आहे. या पडलेल्या जून्या इमारतीची माहिती उपलब्ध नसल्याने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अशाप्रकारच्या इमारतीबाबत स्वतंत्र बाब ठेवण्याचे ठरले.

नि.का.अ. तथा सचिव हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, अ.क्र.१२ वर नमूद केलेल्या भू.पा.क्र.१३०३, लोअर परेल विभाग, काकासाहेब गाडगीळ मार्ग येथील लोकमान्य नगर प्रियदर्शनी को.ऑप.हौ.सो.लि. ही मालमत्ता मुंबई मंडळाने न्यू हिंद मिलकडून विकत घेतलेली आहे. हया मालमत्तेवर एकूण १० इमारती असून शासनाने हया १० इमारतींना नुकताच अ. वर्गाप्रमाणे उपकर आकारला आहे. मुंबई मंडळाने १०१८८.४० चौ.मी. जागेचा ताबा सदर लोकमान्य नगर प्रियदर्शनी को.ऑप.हौ.सो.लि.यांना दि. ३१.१२.८८ रोजी दिला आहे. जमिनीची किंमत मुंबई मंडळाकडे जमा करण्यात आली आहे. मात्र अद्याप भाडेपट्टा करारपत्र झालेले नाही. इ.क्र.७ व ८ मधील रहिवाशांचे

स्थलांतर करुन त्याखालील २१०० चौ.मी. भूखंड मुंबई मंडळाच्या ताब्यात द्यावयाचा आहे. मंडळाला एकूण २५६०.०७ चौ.मी. अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. मात्र ही जागा पूर्वी मुंबई मंडळाच्या मालकीची असल्याने पुनर्विकासासाठी ना.ह.प्र.पत्र देण्यापूर्वी मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांची संमती घ्यावी लागणार आहे. मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांच्या संमतीनंतर नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वरील सविस्तर चर्चेअंती वरील १[illegible] प्रस्तावांमध्ये प्रस्तावत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना.ह.प्र.पत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९७ / ७९६</u>

**मुंबई बेटावरील खालील अनुक्रमांक १, २, ३, [illegible], ६, ७, ८, ९, १०, १३ वरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच अनुक्रमांक ४ व ११ वरील पूर्णपणे पूर्वीच पडलेल्या इमारतींबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मत घेऊन अशा इमारतींबाबत निर्णय घेण्यात येईल व त्याप्रमाणे बाब टिप्पणी ठेवण्यात येईल. तसेच अनुक्रमांक ५, [illegible] व १२ वरील प्रस्तावांबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर " ना हरकत प्रमाणपत्र " बाबतची अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.**

१) भुकर पहाणी क्र.१०८०,मांडवी विभाग, विभाग क्र.बी-१०४० ० १०४१, इ.क्र.४५ व ४७, इब्राहिम मोहंमद मर्चंट रोड, मुंबई येथील " मदिना मंझील " हया मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पहाणी क्र.२३७, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३७३३ (१), ३७३३ (२) ३७३३ (३) इ.क्र.२५१-२५१ए, २५३ बी, २५१ सी, मौलाना आझाद रोड, भायखळा,मुंबई येथील " सत्तार मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३) भुकर पहाणी क्र.३१२/१० माटुंगा विभाग, विभाग क्र. एफ.एन.७५२२ (२), इ.क्र.९, हिन्दू कॉलनी रोड न १०, (तेलंग क्रॉस रोड नं.२ व ४), माटुंगा,मुंबई येथील " गोपाळ भुवन" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

४) भुकर पहाणी क्र.८८०,फोर्ट विभाग, विभाग क्र.ए-२४६८, इ.क्र.४२, मारुती लेन,मुंबई येथील "मोहम्मद सालेह बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र विधी सल्लागार/प्रा. यांचे मत घेऊन प्रदान केले जाईल.

५) अंतिम भूखंड क्र.९९३,नगररचना योजना क्र. ४,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-३१०३ (३),इ.क्र.२४-२४बी, काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर,मुंबई येथील " भागीरथी भवन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांचे आदेश घेऊन अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

६) भुकर पहाणी क्र., ४३४०-४३४१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-७९४६ व ७९४७, इ.क्र.९-१५ व १७-२१, बाप्टी रोड, सी.विभाग, मुंबई येथील " अहमद मंझील व बु-हाणी मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७) भुकर पहाणी क्र.६/१८७६, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-४१३९ (३), इ.क्र.११, डॉ.ए.एन. रोड ,मुंबई येथील " कपाडीया मॅन्शन " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८) भुकर पहाणी क्र.१०९८, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३७२, इ.क्र.५२-५४, खांदिया स्ट्रीट,मुंबई येथील "मिट्टीवाला चाळ " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

९) भुकर पहाणी क्र.४९६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र.३५,(उत्तर) दादर माटुंगा इस्टेट विभाग, विभाग क्र. एफ.एन.७९५९ (७), इ.क्र.२४, हिन्दू कॉलनी,रोड नं.१९/सी, माटुंगा, मुंबई येथील " ग्रिसेल्डा हाऊस" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१०) भुकर पहाणी क्र.५०/७४,परेल शिवडी विभाग, विभाग क्र..एफ.एस.५४५ (१), इ.क्र.३८५ सी, डॉ. बी.ए.रोड, गणेश गल्ली, लालबाग, मुंबई येथील " रंगवाला बिल्डिंग " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र., २४०१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५३०८ इ.क्र.२८,पहिला भोईवाडा, मुंबई येथील चुनीलाल बलदेवदास बिल्डिंग हया नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मत घेऊन प्रदान केले जाईल.

१२) भुकर पहाणी क्र.१३०३ (भाग), लोअरपरेल विभाग,(१०१८८.४० चौ.मी.),अंतिम भूखंड क्र. ५८० (भाग), नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग क्र.जीएन- ३४६४ (१)(२)(३)(४)(५)(६), ३४६५ (१)(२), ३४६६ (१) व (२) इ.क्र.१, १ए, १बी, १सी, ३सी, ३डी, ५ए, ५बी, सयानी रोड, व १५बी, २७ एलफिन्स्टन रोड,काकासाहेब गाडगीळ मार्ग,दादर, मुंबई येथील " लोकमान्य नगर" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत

प्रमाणपत्र" मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांचे आदेश घेऊन अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

१३) भुकर पहाणी क्र.५४८, मलबार कंबाला हिल विभाग, विभाग क्र.डी-२८८१ (९), इ.क्र.५, तेजपाल रोड, गावदेवी, मुंबई येथील " हरी भवन" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१४) भुकर पहाणी क्र.२०९,परेल शिवडी विभाग, इ.क्र.१४, १४ए,१६,१६ई, १८, १२एच, १२जे, १२जी, १२एफ, १२के, १२ई, १२एल, १२डी, १२सी, १२बी, १२ए व १२, ठोकरसी जिवराज रोड, मुंबई येथील " रावजी सोजपाल कंपाऊंड " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

------------oo---------------

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाच्या बांधकामाची मे. कॅनन इंजिनियरिंग हयांची निम्नतम निविदा मंडळाने नामंजूर केल्यानंतर ती प्राधिकरणाने मंजूर केली आहे. त्यामुळे हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा त्यांनी केली. मंडळाने नामंजूर केलेली निविदा प्राधिकरणाने मंजूर करणे हा मंडळाचा अपमान आहे. प्राधिकरण जर मंडळाने घेतलेल्या निर्णयाविरुध्द निर्णय घेऊ शकत असेल तर मंडळही प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाविरुध्द निर्णय घेऊ शकते. ही निविदा प्राधिकरणाकडे सादर करताना मंडळाने घेतलेल्या निर्णयाची कल्पना त्यांना द्यावयास हवी होती. तसेच मंडळाच्या संमतीनंतरच सदर निविदा प्राधिकरणापुढे सादर करावयास हवी होती.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाची वस्तुस्थिती मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या नजरेस आणण्यात आली असून त्यांना ही निविदा मंडळाने नामंजूर केल्याचे सांगण्यात आले होते. परंतु मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांनी तदनुषंगाने ही निविदा नामंजूर करण्याची कोणतीच कारणे दिली नसल्याचे सांगितले. मंडळाने निविदा मंजूर केल्यानंतर काय काय झाले हयाची माहिती उपमुख्य अभियंता (सं.शि.) हयांनी मंडळापुढे सादर करण्यास मुख्य अधिकारी हयांनी सुचविले.

तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (सं.शि.) हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने निविदा नामंजूर केल्यानंतर संबंधित ठेकेदाराला त्यांची निविदा नामंजूर केल्याचे कळविण्यात आले होते. तदनंतर सदर ठेकेदाराने पत्र पाठवून मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांना सदर निविदा स्विकृत करण्याची विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांनी हया प्रकरणाची वस्तुस्थिती सादर करण्याचे आदेश दिले होते. तदनुसार हया प्रकरणाची वस्तुस्थिती मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांना सादर करण्यात आली होती. हया वस्तुस्थितीमध्ये मंडळाने ही निविदा नामंजूर करण्याची कारणेही कळविली

होती. तदनुषंगाने मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी सदर निविदा प्राधिकरणापुढे सादर करण्याचे आदेश दिल्यानंतर ही निविदा प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करण्यात आली. हयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन कमी टक्केवारीमुळे बांधकामाच्या दर्जाविषयी साशंकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग हयांनी तदनुषंगाने असा मुद्दा उपस्थित केला की, पुनर्रचनेच्या कामांसाठी अर्हताप्राप्त ठेकेदारांची जी यादी करण्यात येत आहे त्यामध्ये हया ठेकेदाराचे नाव आहे का ? प्राधिकरणाच्या उपस्थित सन्मा. सदस्यांनी असेही मत प्रदर्शित केले की, निम्नतम निविदाधारकाच्या बोलीप्रमाणे हया बांधकामाचा दर रु. ५५५/- ते रु. ५६०/- प्रति चौ.मी. येतो जो किफायतशीर आहे. हया ठेकेदाराने जी कामे केली आहेत त्यांची पाहणी करुन निर्णय घेण्याचे प्राधिकरणाच्या बैठकीत ठरले.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, एखादी निविदा रद्द केल्याचे संबंधित ठेकेदारास कळविल्यानंतर संबंधित कामांची निविदा नव्याने पुन्हा मागविण्यासाठी किती कालावधी लागतो व नव्याने निविदा मागविताना निविदा सादर करण्याचा कालावधी कमी केला जातो का ? तसेच नव्याने निविदा मागविण्याचे अधिकार कोणाला आहेत ?

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, निविदा स्विकृत करण्या-या अधिका-यास निविदा नव्याने मागविण्याचे अधिकार आहेत. नव्याने निविदा मागविताना निविदा सादर करण्याचा कालावधी वरिष्ठ अधिका-यांच्या परवानगीने १५ दिवसांवरुन कमी केला जाऊ शकतो.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, निविदा नामंजूर केल्यानंतर नव्याने निविदा मागविण्याची कार्यवाही का सुरु करण्यात आली नाही ? तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (सं.शि.) हयांनी असे प्रतिपादन केले की, निविदा नामंजूर केल्यानंतर त्याबाबत संबंधित ठेकेदाराने मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना निवेदन दिले होते व सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी वस्तुस्थिती सादर करण्यास सांगितल्यानुसार सदर वस्तुस्थिती मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना सादर केली होती. तदनंतर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी दिलेल्या आदेशांनुसार सदर निविदा प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करण्यात आली होती.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, मंडळाने ही निविदा कोणत्या बैठकीत नामंजूर केली होती, ही निविदा नामंजूर झाल्याचा निर्णय केव्हा स्थायी करण्यात आला, ही निविदा नामंजूर केल्याचे संबंधित ठेकेदारास केव्हा कळविले व संबंधित ठेकेदाराने मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना केव्हा निवेदन दिले?

सचिव हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही निविदा मंडळाच्या दि.१६.१०.२००३ रोजीच्या बैठकीत नामंजूर करण्यात आली होती. ही निविदा नामंजूर झाल्याचे १७ नोव्हें. २००३

रोजीच्या मंडळाच्या बैठकीत स्थायी झाले. उपमुख्य अभियंता (सं.शि.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही निविदा नामंजूर झाल्याचे मंडळाच्या दि. १७.११.२००३ रोजीच्या बैठकीत स्थायी झाल्यानंतर सदर निविदा नामंजूर केल्याचे संबंधित ठेकेदारास दि. २७.११.२००३ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तदनंतर संबंधित ठेकेदाराने दि. २७.११.२००३ रोजीच्या पत्रान्वये मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना मंडळाच्या निर्णयावर फेरविचार करण्यासंबंधी निवेदन दिले. यावर उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या आदेशान्वये याबाबतची सविस्तर वस्तुस्थिती दि. ५.१२.२००३ रोजी सादर केल्यानंतर मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या आदेशाप्रमाणे प्राधिकरणापुढे सदर निविदा प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करण्यात आली होती.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ही निविदा प्राधिकरणाच्या दि. ०९.०१.२००४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आली. ही निविदा नामंजूर झाल्याचे मंडळाच्या दि. १७.११.२००३ रोजीच्या बैठकीत स्थायी झाल्यानंतर ही निविदार नामंजूर केल्याचे संबंधित ठेकेदारास त्वरित कळविणे आवश्यक होते.

सन्मा. सदस्य सर्वश्री सचिन सावंत, विश्वास मोकाशी व गजेंद्र लष्करी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, सदर निविदा नामंजूर झाल्याचे दि. १७.११.२००३ रोजीच्या बैठकीत स्थायी झाल्यानंतर नव्याने निविदा मागविण्याची कार्यवाही का करण्यात आली नाही ?

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने हया प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी हयांना दिले. तसेच हयाबाबत प्राधिकरणास चर्चा करुन विनंती करावी की मंडळाने ही निविदा नामंजूर केली असल्याने हयाबाबतची पुढील कार्यवाही त्वरित स्थगित करावी. हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याबरोबरही चर्चा करण्यात येईल.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये ही निविदा मंजूर केल्याचा निर्णय अद्याप कळविलेला नाही.

तदनंतर उपमुख्य अभियंता (पुनर्र.) व का.अ./पु.वि.२ हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये इ.क्र.६७४-६७४ ए, ना.म.जोशी मार्ग हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची निविदा स्विकृत करण्यात आली आहे. हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांनी असे मत व्यक्त केले की, ठेकेदाराने निविदेचा दर अतिशय कमी दराने भरला असल्याने सदर ठेकेदार कामाचा दर्जा चांगला राखेल किंवा नाही हयाबाबत साशंकता वाटते. त्यामुळे मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांनी असे आदेश दिले आहेत की, ठेकेदाराकडून ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम घेऊन ती त्याला अंतिम देयक अदा केल्यानंतर ५ वर्षानंतर परत करावी. त्यानुसार ते ठेकेदारास कळविण्यात येत आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशाप्रकारे इतर कामांमध्येही सुरक्षा अनामत रक्कम घेण्यास हरकत नसावी व त्यानुसार प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा. परंतु निविदेच्या करारपत्रातील अटींनुसार आपण असे करु शकतो का ? तसेच काम पूर्ण झाल्यानंतर जर ठेकेदाराने न्यायालयामार्फत सुरक्षा अनामत रक्कम एक महिन्याच्या आत मागितल्यास आपण त्यास विरोध करु शकतो का ?

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, निविदा देकारपत्र देताना त्यामध्ये आपण तशी अट विहित करुन सुरक्षा अनामत रक्कम भरुन घेणार आहोत. त्यामुळे त्याला जर न्यायालयात त्यास विरोध करावयाचा असेल तर तो सदर रक्कम भरण्यापूर्वीच करेल. एकदा त्याने सुरक्षा अनामत रक्कम जर मंडळाकडे भरली तर तदनंतर तो त्याबाबत न्यायालयात दाद मागू शकणार नाही असे वाटते. हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांचे आदेश असून त्यांच्या आदेशानुसार ही बाब मंडळाच्या नजरेस आणून व त्यास मंडळाची परवानगी घेऊन त्याप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम सदर ठेकेदाराकडून घेतली जाईल. हया कामाचा समावेश न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेमध्ये असून हया पुनर्बांधणी कामाची सुरुवात जानेवारी २००४ पर्यंत करण्यात येईल असे वचनपत्र मंडळाने न्यायालयात दाखल केलले आहे. त्यामुळे व मा. अध्यक्षांनी नुकतेच आदेश दिले असल्याने हा प्रस्ताव नियमित कार्यसूचीत समाविष्ट करता आला नाही. मात्र हयाबाबत जनहित याचिके संदर्भात मंडळाने दाखल केलेल्या वचनपत्रानुसार हे काम जानेवारी २००४ मध्ये सुरु करावयाचे असल्याने आयत्यावेळी हा विषय मंडळापुढे सादर केलेला आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, संबंधित ठेकेदार जर मा. अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करुन ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम ५ वर्षांनंतर परत घेण्यास तयार असेल तर त्यास मंडळाच्या मंजूरीची आवश्यकता नाही. हयाबाबत धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. त्यामुळे उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी त्यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही करावी.

तदनंतर मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, जनहित याचिकेमध्ये हया इमारतीचा समावेश करण्याचे कारण काय आहे ? तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीरांच्या दुरुस्तीबाबत ही जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. हया इमारतीचेही काम बरीच वर्षे रेंगाळल्याने व काम लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने हया इमारतीचा समावेश जनहित याचिकेमध्ये केला होता.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, हया इमारतीशेजारील इमारत एकत्ररित्या पुनर्बांधणीसाठी घ्यावयास हवी होती. हयाबाबत तपासणी करण्यात यावी अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, गिरगाव येथील बदामवाडी हया इमारतीची नुकतीच पाहणी करण्यात आली.हया पाहणीमध्ये रहिवाशांनी इमारत मालकास देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे अशी मागणी केली होती तसेच हयाबाबत मंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेचा कार्यवृत्तांताही त्यांना हवा आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी नुकतीच त्यांची भेट घेतली असून हया इमारतीच्या पुनर्विकासासाठी देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले किंवा नाही हयाची रहिवाशांना खातरजमा करावयाची आहे. हयाबाबत नि.का.अ./दु.व पु. मंडळ यांच्या कार्यालयामार्फत रहिवाशांना खातरजमा करुन घेण्यास सांगितले आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशा सूचना केल्या की, निवासी कार्यकारी अभियंता हयांनी ना.ह.प्र.पत्र रद्द केले आहे किंवा नाही हयाबाबत त्वरित कळवावे. मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता हयांच्याकडे अशी विचारणा केली की, ना हरकत प्रमाणपत्र रद्द केले आहे किंवा नाही. तदनुषंगाने नि.का.अ. हयांनी ना हरकत प्रमाणपत्र रद्द झाल्याचे सांगितले.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, श्री. युसुफ कासम हयांनी अशी तक्रार केली आहे की, वि.नि.क्र. ३३ (७) चे नियम डावलून न्यू काझी स्ट्रीट, पायधुनी, मुंबई हया ठिकाणी २० मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे? अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली.

कार्यकारी अभियंता, सी १-२ विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र केलेले आहे. हया इमारतीच्या शेजारील इमारतीतील रहिवाशाचा हया पुनर्विकास योजनेस विरोध आहे व त्याने ही तक्रार केलेली असावी. म.न.पा. ने नियोजित इमारतीच्या नकाशांना अद्याप मंजूरी दिली नसल्याने पुनर्विकासाच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही. मात्र हयाठिकाणी २० मजल्यांची नवीन इमारत प्रस्तावित आहे.

नि.का.अ. तथा सचिव हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा. ने मंजूर केलेल्या नकाशांच्या प्रती मंडळाला प्राप्त होत असतात. नवीन इमारतीचे काम म.न.पा. ने मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे झाले आहे किंवा नाही हे पाहणे म.न.पा. चे काम आहे. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे तपासण्यासाठी मंडळाकडे यंत्रणा नाही. म.न.पा. नियोजित इमारतींच्या नकाशांना मंजूरी देत असल्याने इमारतीचे काम मंजूर नकाशाप्रमाणे झाले आहे किंवा नाही हयाची जबाबदारी मंडळाची नाही तसेच हे तपासण्यासाठी मंडळाचे अधिकारी रोजच्या रोज संबंधित साईटवर

जाऊ शकत नाहीत व मंडळाच्या अधिका-यांनी ही जबाबदारी स्विकारल्यांस काही इमारतींचे काम जर मंजूर नकाशाप्रमाणे झाले नाही तर त्यासाठी मंडळाच्या अधिका-यांना जबाबदार धरले जाईल. परंतु एखाद्या विशिष्ट प्रकरणात मंडळाच्या सन्मा. सदस्य व अधिका-यांना अशा इमारतीची पाहणी करण्याचे अधिकार आहेत. ज्याप्रमाणे बीच कॅन्डी, अमेरिकन कौन्सिलेटसमोर बांधण्यात आलेल्या सूरज अपार्टमेंटस् बाबत आपण पाहणी करुन कार्यवाही केलेली आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, भोगवटा प्रमाणपत्राची परवानगी देताना आपण जून्या उपकरप्राप्त इमारतीतील सर्व रहिवाशांना नवीन इमारतीत देय क्षेत्रफळाचे गाळे दिले आहेत किंवा नाहीत हयाची पाहणी मंडळाच्या अधिका-यांमार्फत केली जाते.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीरांमध्ये ज्या नवीन इमारती बांधण्यात आल्या आहेत त्यांचे गाळे वाटप कोणत्या रहिवाशांना केले आहे त्याची यादी इतर माहितीसह मंडळापुढे सादर करण्याबाबत त्यांनी दि. ०८.१२.२००३ रोजी पत्र दिले होते. परंतु हयाबाबतची माहिती मंडळाच्या मागील तसेच हया बैठकीतही सादर करण्यात आलेली नाही.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मंडळाच्या मागील बैठकीत चर्चा करण्यात आली होती. हया गाळयांच्या वाटपात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याची चौकशी करण्यात आली. हया गाळे वाटपात पूर्वी गैरव्यवहार होत होता ही वस्तुस्थिती आहे. तसेच ज्या रहिवाशांचे जुनें गाळे तोडण्यात येत आहेत त्यांना प्राधान्याने पर्यायी गाळे न देता जे रहिवाशी दादागिरी करतात त्यांना गरज नसताना प्राधान्याने गाळे दिले जातात ही वस्तुस्थिती आहे. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीचे काम सुरळीत चालू रहावे म्हणून त्यांच्या कर्मचा-यांसाठी कोणाही व्यक्तीस गाळे वाटप करणे अतिशय चुकीचे आहे. हयाबाबत मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण हयांनी त्यांच्याशी चर्चा केली असून मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे आदेश दिले आहेत की, हया गाळयांचे वाटप विहित पध्दतीनुसार मुख्य अधिकारी हयांनी करावे. तदनंतर मा. सभापती व मुख्य अधिकारी हयांनी श्री. पेठारे, सहा.मिळकत व्यवस्थापक हयाना असे आदेश दिले की, मा. सदस्य श्री. मोहन देसाई यांना हवी असलेली माहिती त्वरित द्यावी व माहितीची पोच द्यावी.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, ज्या प्रकरणात ना हरकत प्रमाणपत्र देऊन ५-१० वर्षे होऊनही अद्याप पुनर्विकासाच्या कामास सुरुवात झालेली नाही अशा प्रकरणांची यादी देण्याबाबत मंडळाच्या मागील बैठकीत सांगितले होते. तदनुषंगाने मा. सभापती व मुख्य अधिकारी हयांनी असे सांगितले की, अशा प्रकरणांची यादी मागील बैठकीत देण्यात आलेली आहे. मा. सभापती हयांनी असेही प्रतिपादन केले की, सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर असे ठरविले होते की, ज्या प्रकरणात कामे सुरु झालेली नाहीत अशा प्रकरणात " कारणे दाखवा नोटीस " देऊन

ना हरकत प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाई सुरु करावी व तदनुसारच बदामवाडी प्रकरणात ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, तीन प्रकरणात आपण ना हरकत प्रमाणपत्र रद्द केली आहेत व उर्वरित काही प्रकरणात न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने, काही प्रकरणात तांत्रिक अडचणींमुळे नकाशे मंजूर न झाल्याने ना हरकत प्रमाणपत्र रद्द करता येऊ शकत नाहीत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्रत्येक प्रकरणामध्ये ना हरकत प्रमाणपत्रधारकांनी खुलाशादाखल जी काही कारणे दिली आहेत ती तपासून त्वरित निर्णय घ्यावा. जर ना हरकत प्रमाणपत्रधारकांची चुकी नसेल तर अशा प्रकरणांत ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणे संयुक्तिक होणार नाही. ना.ह.प्र.पत्र रद्द केल्यानंतर पुन्हा जर ना.ह.प्र.पत्रांतर्गत पुनर्विकास करण्याचे ठरविल्यास रहिवाशी वाढीव मागण्या करण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही व त्यामुळे पुन्हा वाद निर्माण होऊन पुनर्विकासाचे काम होणार नाही. हयाबाबत दक्षता घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, रविवार दि. १८.१.२००४ रोजी मा. सभापती, मा. श्री. दिनाझ पत्रावाला, विद्यमान आमदार व श्री. अशोक धात्रक हयांनी कुलाबा संक्रमण शिबीराची पाहणी केली होती. त्यावेळी हया संक्रमण शिबीरातील रहिवाशांनी काही मागण्या केल्या अहेत. हया मागण्याचे निवेदन सहमुख्य अधिकारी हयांना देण्यात येत असून त्याबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी अशी विनंती त्यांनी केली.

तदनंतर मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी असे प्रतिपादन केले की, तत्कालिन मुख्य अधिकारी श्री. झेंडे साहेब असताना मंडळाच्या बैठकीमध्ये अशी चर्चा झाली होती की, मंडळाच्या ज्या कर्मचा-यांना संक्रमण शिबीरात गाळे सेवानिवासस्थान म्हणून वाटप केले आहेत ते गाळे त्यांना मालकी तत्वावर देण्यात यावेत. परंतु अद्याप त्याबाबत पुढे काहीच कार्यवाही झालेली दिसत नाही.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाने नुकताच हयाबाबत निर्णय घेतला असून त्यानुसार वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचा-यांना वाटप केलेली सेवानिवासस्थानाचे गाळे मालकी तत्वावर देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, त्यांच्याकडे संक्रमण शिबीरात राहणा-या मंडळाच्या कर्मचा-यांनी असे निवेदन दिले आह`की,सेवा निवासस्थान म्हणून वाटप केलेले गाळे काही अधिका-यांना व कर्मचा-यांना मालकी तत्वावर अगोदरच वाटप केलेले आहेत. त्यांना त्यावेळचा दर आकारुन नियमित केले गेले आहे. बहुतांश संक्रमण शिबीरांची सद्यः पुनर्रचना करण्यात येत आहे. ज्याप्रमाणे घुसखोर व्यक्तींना नियमित करुन नवीन इमारतीमध्ये नियमित केले जात आहे त्याप्रमाणे त्यांनाही नवीन इमारतीत गाळे देताना नियमित करावे. हयाबाबत त्यांच्याशी चर्चा करुन

त्यांना असे सांगितले आहे की, त्यांना नियमित करण्याचा प्रश्न नसून जी काही गाळयांची किंमत असेल ती किंमत त्यांना मंडळास द्यावी लागेल. हयास हया कर्मचा-यांची संमती आहे.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत प्राधिकरणाने निर्णय घेतला असून हा निर्णय प्राधिकरणाच्या सर्व मंडळातील कर्मचा-यांना लागू आहे. त्यामुळे हयाबाबत मंडळापुढे पुन्हा प्रस्ताव आणण्याचा प्रश्न उदभवत नाही.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये सायन येथील एलटीवाला बिल्डिंगच्या दुरुस्तीबाबत मुद्दा उपस्थित केला होता. हया इमारतीच्या दुरुस्तीबाबत रहिवाशांच्या तक्रारी असून इमारतीची पाहणी करण्याबाबत का.अ./फग (ऊ) विभाग हयांना सांगितल्यानुसार त्यांनी त्याबाबत लक्ष घातले जाईल असे त्यांनी सांगितले होते. मात्र हयाबाबत अद्याप काहीच कार्यवाही केलेली नाही.

का.अ./फग (ऊ) विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पाहणी त्यांनी केली आहे. रहिवाशांनी हया कामाची देखरेख करण्यासाठी त्यांचा सुरपरवायझर ठेवला असून मंडळाचे वास्तुशास्त्रज्ञ व उप अभियंता हयांच्यामार्फतही वेळोवेळी कामाची देखरेख केली जात आहे.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, त्यांनी जेव्हा हया इमारतीबाबत मंडळाच्या बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा का.अ. हयांनी इमारत पाहणी केल्यानंतर त्यांच्याशी चर्चा करावयास हवी होती किंवा इमारत पाहणीवेळी त्यांनाही बोलाविणे आवश्यक होते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, कार्यकारी अभियंता, फग/द विभाग व सन्मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी संयुक्तपणे हया इमारतीस त्वरित भेट द्यावी.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, त्यांनी जेव्हा कुलाबावाडी व कुलाबा संक्रमण शिबीरास भेट दिली तेव्हा असे दिसून आले की, हया संकमण शिबीरांचा पुनर्विकास करण्यास मोठा वाव आहे. त्यामुळे त्यांनी सन्मा. सदस्य व मंडळाच्या अधिका-यांना अशी विनंती केली की, त्यांनी हयाबाबत सखोल विचार करुन चांगला प्रस्ताव तयार करावा. हया संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाची योजना प्रस्तावित केलेली आहेच. परंतु काहीतरी चांगले करण्याच्या दृष्टीने एक खास विभाग स्थापन करुन विशेष अधिका-यांची नेमणूक करुन एक आराखडा तयार करण्याबाबत निर्णय घ्यावा.

तदनंतर स्टॉल्स व ओटेवाले हयांना कायमस्वरुपी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. तदनुषंगाने मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, हया स्टॉल्स व ओटेवाल्यांना जागा देण्यात येत आहेत का ?

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दि. ५.२.९९ रोजी निर्गमित झालेल्या आदेशांनुसार एकाच दिवशी ३०० ओटेवाल्यांना परवाने दिले गेले आहेत व हे सर्व परवाने बोगस असल्याचे दिसून आले आहे. हयाबाबत शिवसेनेमार्फत मोर्चा आणून त्यांनी ते फार वर्षांपासून तेथे रहात असल्याने त्यांना करण्यात यावे अशी मागणी केली आहे.रितसर फक्त १७ ते १८ स्टॉल्स/ओटेवाले आहेत.

मिळकत व्यवस्थापक हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ३०० बोगस स्टॉल्स / ओटे तोडण्यास गेल्यानंतर एकाने न्यायालयात याचिका दाखल केली असून त्याची सुनावणी दि. ३.२.२००४ रोजी आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत न्यायालयात आपली बाजू स्पष्टपणे मांडून त्या बोगस परवानाधारक स्टॉल्स/ओटेवाल्यांना हटविण्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मा. न्यायालयात आपली बाजू स्पष्टपणे मांडली जाईल.

मा. सभापती हयांनी बैठकीच्या शेवटी सन्मा. सदस्य ,अधिकारी/कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाची पुढील बैठक ~~शनिवार~~ बुधवार दि. ११.०२.२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहीर केले.

सचिव / मा.सभापती | उप मा.सभापती

नि.का.अ./ मुं.ई.दु.व पु.मंडळ

६/२/२००४

मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ

224 REE
7.2.04

117
9/2/04

परिशिष्ट 'अ'

**मंडळाच्या दिनांक २१/१/२००४ रोजी होणाऱ्या ९७ व्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.**

अ विभाग

| अ.क्र | इमारतीचा तपशिल | दुरुस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या माडेकरुंची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरुस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | इ.क्र. ७१- ७३, पेरीन नरीमन स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ + ३+४पार्ट ८ + २= १० | ७६३.३९ ८८७.३३ | ६७७३८०.०० | ४२७३८०.०० | ० | मंजूर |
| २. | इ.क्र. ३१५, शाहिद भगतसिंग रोड | पांचवा मंडळ | तळ + ४ १४ + १४= २८ | ११८७.०० ९८२.४४ | ११६६९४४.०० | ३८५६९६.०० | ० | मंजूर |
| ३. | इ.क्र. १६८-१६८-अे, कांबेकर स्ट्रीट | पहिला मंडळ | तळ + ४ १५ + १= १६ | ४०३.०० ७३०.१९ | २९४२७०.०० | २९४२७०.०० | ० | मंजूर |
| ४. | इ.क्र. १०७-१०९ व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट | चौथा मंडळ | तळ + ५ ५ + २७= ३२ | ७२४.५० १०८९.५३ | ७८९३६९.०० | २४४७९८.०० | ६४८६९.०० | मंजूर |
| ५. | इ.क्र. २८ सॅन्डहर्ट रोड (एस. व्ही. पी. रोड) | दुसरा/सुधारीत मंडळ | तळ + ५ १७ + १३= ३० | २८५०.०० ९९९.९६ | २८४९९०६.०० | १४५२६७५.०० | ० | मंजूर |
| ६. | इ.क्र. ३३ कांबेकर स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + ३ १२ + २= १४ | ४२५.४२ ९७२.३८ | ४१३४५९.०० | २०७९६२.०० | ० | मंजूर |
| ७. | इ.क्र. ११२-११४, जेल रोड | दुसरा मंडळ | तळ + २+३ अशंतः २६ + ८= ३४ | १०११.६४ ८३०.५७ | ८४०२४०.०० | ६८१२२४.०० | ० | मंजूर |
| ८. | इ.क्र. ११२-११४, भंडारी स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ + ३ ४३ + ११= ५४ | १४८३.१६ २१७३.४२ | ३२२३५३५.०० | २१९८०६१.०० | ० | मंजूर |
| ९. | इ.क्र. २८७, अब्दुल रहेमान स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + ४ ४ + ४= ८ | २९८.०० १०१५.६७ | ३०२६७०.०० | २४३९१३.०० | २४६७७.०० | मंजूर |
| १०. | इ.क्र. ४३ निझाम स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ + २ ६ + १= ७ | २८८.०० १०५४.८८ | ३०३८०६.०० | १७०२६७.०० | १५८०६.०० | मंजूर |
| ११. | इ.क्र. १७, संत सेना महाराज मार्ग | तिसरा | तळ + १ | ३८६.८४ | ३७६८७४.०० | १३१७२२.०० | ० | मंजूर |

३८

६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंडळ | ७ + १= ८ | ९७४.२४ | | | | |
| १२. | इ.क्र. ४१-४३अे, काझी स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ + ३<br>८ + २= १० | ४०४.००<br>९९८.८० | ४०३५१५.०० | २११५७९.०० | ० | मंजूर |
| १३. | इ.क्र. १२८ बापू खोटे स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + ३<br>२ + २= ४ | १८४.५३<br>११०७.६० | २०४३८६.०० | १३७०००.०० | १९८५६.०० | मंजूर |
| १४. | इ.क्र. ६४, सी. पी. टँक रोड | दुसरा मंडळ | तळ + ३<br>१५ + ५= २० | ४६०.००<br>९२९.७५ | ४२७६८४.०० | ३७४०२४.०० | ० | मंजूर |
| १५. | इ.क्र. ५२-५६ निझाम स्ट्रीट | पहिला मंडळ | तळ + १<br>६ + २= ८ | ३२३.३१<br>८७६.६१ | २८३४१७.०० | २८३४१७.०० | ० | मंजूर |
| १६. | इ.क्र. १-१७, किका स्ट्रीट/ २-१८, बापू खोटे स्ट्रीट | चौथा मंडळ | तळ + ३<br>३९ + ५८= ९७ | २९१७.८२<br>९९९.९९ | २९१७८१२.०० | १४९१५७६.०० | ० | मंजूर |
| १७. | इ.क्र. ३-३अे, बोरा स्ट्रीट | पांचवा मंडळ | तळ + ४<br>३३ + ८= ४१ | १२०२.००<br>९९६.६९ | ११९८०२५.०० | २९५२७६.०० | ० | मंजूर |
| १८. | इ.क्र. ३९ करेल वाडी | दुसरा मंडळ | तळ + ३<br>४ + ०= ४ | २५०.००<br>९९७.७० | २४९४२६.०० | १७५०२६.०० | ० | मंजूर |
| १९. | इ.क्र. ३६४-अे, जे. एस. एस. रोड | तिसरा/ सुधारीत ना.ह.प्र. | तळ + ३<br>२ + २= ४ | १३९९.०३<br>११५१.४१ | १६१०८५९.०० | १०३०८५९.०० | २११८२९.०० | मंजूर |
| २०. | इ.क्र. १७३ डॉ. व्हीगा स्ट्रीट | पहिला मंडळ | तळ + १+अॅटीक<br>३ + ३= ६ | ५३४.७०<br>५७४.८८ | ३०७३९२.०० | ३०७३९२.०० | ० | मंजूर |
| २१. | इ.क्र. २१, भास्कर लेन | दुसरा मंडळ | तळ + २<br>७ + ९= १६ | २९४.२७<br>९९९.५८ | २९४१५३.०० | ८२२३५.०० | ० | मंजूर |
| २२. | इ.क्र. २१, दुसरी फनसवाडी | दुसरा मंडळ | तळ + २<br>२ + २= ४ | २४६.२३<br>९९०.२२ | २४३८२३.०० | १६९९५४.०० | ० | मंजूर |
| २३. | इ.क्र. १००-११०-११८, पहिली मरीन स्ट्रीट | पहिला/ सुधारीत मंडळ | तळ + ५<br>२२ + १६= ३८ | ३९२४.३६<br>९५०.०० | ३७२८१८५.०० | ७९००७७.०० | ० | मंजूर |
| २४. | इ.क्र. ३५-४७, तेल गल्ली | तिसरा | तळ + ३ | ३१२.३२ | ४५७५८५.०० | २१५८७५.०० | १४५२६३.०० | मंजूर |

१०

७७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ना.ह.प्र. | ५ + १०= १५ | १४६५.११ | | | | |
| २५. | इ.क्र. २९-के, खोताची वाडी | पहिला मंडळ | तळ + २<br>५ + ०= ५ | २१७.५३<br>१०५८.८९ | २३०३४०.०० | २३०३४०.०० | १२८१०.०० | मंजूर |
| २६. | इ.क्र. २९ व ११ अे सीरी रोड | पहिला मंडळ | तळ + १<br>२ + १= ३ | ९२.९१<br>९१०.४५ | ९२०२३.०० | ९२०२३.०० | ० | मंजूर |
| २७. | इ.क्र. ९ बी, आत्माराम रांगणेकर मार्ग | दुसरा/ सुधारीत मंडळ | तळ + ३<br>४० + ६= ४६ | १८०५.००<br>८९७.७१ | १६२०३७८.०० | १२८६६२३.०० | ० | मंजूर |
| २८. | इ.क्र. ३८४-अे, एम. एस. अली रोड | तिसरा/ सुधारीत मंडळ | तळ + ४<br>१४ + ७= २१ | १२६०.००<br>१०१५.६३ | १२७९७००.०० | ६५९६९४.०० | १९६७४.०० | मंजूर |
| २९. | इ.क्र. २९२, जे के, जावजी दादाजी मार्ग | पहिला मंडळ | तळ + ४<br>२३ + २= २५ | १४२१.१८<br>२९६.४८ | ४२१३६२.०० | ४२१३६२.०० | ० | मंजूर |

८१

८८

## परिशिष्ट "ब"

### मंडळाच्या दि.२२/१/२००४ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी

| अ. क्र. | विभाग | वर्गवारी | ईमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा<br>---------<br>मंडळ/ ना.ह.प्र. | मजले<br>---------<br>भाडेकरु नि+अनि=एकूण | क्षेत्रफळ चौ.मी.<br>---------<br>दर चौ.मी.चा खर्च | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम<br>---------<br>निव्वळ टप्प्याची रक्कम | रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम | रु.१०००/-प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ई | अ | ४, ख्रिस्त चर्च लेन, भायखळा, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१४ + ० = १४ | १९०२.४३<br>६२६.०८ | ६९०२१०/-<br>६९०२१०/- | ६९०२१०/- | -- | मंजूर |
| २. | -"- | -"- | ९९, कामाठीपुरा, ८वी गल्ली, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>६ + १ = ७ | २१७.३५<br>१००३.५९ | २१८१३१/-<br>२१८१३१/- | २१७३५०/- | ७८१/- | -"- |
| ३. | -"- | -"- | ११२, कामाठीपुरा, ५वी गल्ली, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ +२ +३<br>अंशतः<br>८ + २ = १० | २२९.९७<br>१३०६.३० | २८१४५५/-<br>२२१४९६/- | १५५५०१/- | ६५९९५/- | -"- |
| ४. | -"- | -"- | ३७-अे, नेसबीट रोड, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>६० + ० = ६० | १२९७.७७<br>७६३.०४ | ९९०२५१/-<br>७१०६०२/- | ७१०६०२/- | -- | -"- |
| ५. | -"- | -"- | ४, कामाठीपुरा, १२वी गल्ली, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ +२ अंशतः<br>३रा<br>५+ १ =६ | १४४.७०<br>११०३.३२ | १५९६५२/-<br>११८०६०/- | ११८०६०/- | १४,९५२/- | -"- |
| ६. | -"- | -"- | ९५-९५अे, ९७-९७अे, शंकर पुपाला रोड, मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ +२<br>३६+ ४ = ४० | ७७१.८८<br>९८९.०६ | ७६३४३६/-<br>२९६५६४/- | २९६५६४/- | -- | -"- |
| ७. | -"- | -"- | २६-३०, क्लेअर रोड, मुंबई | चौथा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१२+ ४ =१६ | १२२६.८१<br>९८७.४८ | १२११४५४/-<br>६३०७२१/- | ६३०७२१/- | -- | -"- |
| ८. | -"- | -"- | २०८-२०८, डॉ.मस्करेन्हास रोड, मुंबई | चौथा टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>२३ + ९ = ३२ | १३५६.३६<br>८०१.७५ | १०८७४५९/-<br>५४७१३५/- | ५४७१३५/- | -- | -"- |
| ९ | फ.ग(द) | अ | १४४, वरळी कोळीवाडा, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>६ + १ = ७ | २९२.९०<br>९५४.५६ | २७९५९२/-<br>२७९५९२/- | २७९५९२/- | -- | -"- |
| १०. | -"- | -"- | २१७-जी, अलीपुरा मॅन्शन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>३६ + ० = ३६ | ७८३.७१<br>९३५.०३ | ७३२७९४/-<br>७३२७९४/- | ७३२७९४/- | -- | -"- |

८२

६७

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. | फ.ग(द) | -"- | ६१-अे, परेल व्हीलेज, नानाभाई<br>बिल्डींग, परेल व्हीलेज, परेल, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>८ + ० = ८ | १५१.४३<br>९८६.१७ | १४९३३७/-<br>१४९३३७/- | १४९३३७/- | -- | मंजूर |
| १२. | -"- | -"- | १४, ला पिंटा, वासुदेव पेडणेकर<br>मार्ग, भोईवाडा, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१७ + ० = १७ | ११४२.१०<br>६५३.५४ | ७४६४१५/-<br>६९११७०/- | ६९११७०/- | -- | -"- |
| १३. | -"- | -"- | नर्मदा निवास, परमार गुरुजी मार्ग,<br>लालबाग, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ४<br>१२ + १ = १३ | १६३४.१७<br>६८८.९९ | ११२५९३९/-<br>३०८८५४/- | ३०८८५४/- | -- | -"- |
| १४. | -"- | -"- | १८५, मेहता बिल्डींग, माधवदास<br>पास्ता रोड,<br>दादर (पुर्व), मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>१५ + १८ = ३३ | २४५५.०४<br>५२५.४७ | १२९००७३/-<br>५५३५६१/- | ५५३५६१/- | -- | -"- |
| १५. | -"- | -"- | १२, हक बिल्डींग, शंकर आबाजी<br>पालव मार्ग,<br>दादर (पुर्व), मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>२२ + ४ = २६ | ६७०.००<br>१०१०.७४ | ७३०७९९/-<br>२५९१०२/- | १९८३०३/- | ६०,७९९/- | -"- |
| १६. | -"- | -"- | १८६, प्रकाश मॅन्शन,<br>डॉ.बी.ए.रोड, दादर (पुर्व), मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ४<br>३९ + १५ = ५४ | २१८४.१६<br>९६१.५४ | २१००१६२/-<br>४५३३४४/- | ४५३३४४/- | -- | -"- |
| १७. | -"- | अ | १८, गणपती भुवन, जहांगीर<br>मेरवानजी स्ट्रीट, परेल, मुंबई | चौथा टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>४४ + ० = ४४ | ९८७.००<br>११००.६२ | १०८६३१४/-<br>३१०४५८/- | २९११४४/- | ९९३१४/- | -"- |
| १८. | -"- | -"- | १६५-१६९बी, भगवान भुवन,<br>दादासाहेब फाळके रोड, दादर,मुंबई | पाचवा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ + ३<br>४८ + १० = ५८ | १३६४.५१<br>११६७.७४ | १५९३३९८/-<br>५६०९१५/- | ३३२०२७/- | २२८८८८/- | -"- |
| १९. | फ.ग(उ) | -"- | २३७४-एफ, जमनादास चाळ,<br>डंकन कॅाजवे रोड, सायन, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळमजला फक्त<br>७ + ० = ७ | १६२.७३<br>८४५.९९ | १३७६६८/-<br>१३७६६८/- | १३७६६८/- | -- | -"- |
| २०. | -"- | क | ६२, मोहन निवास,<br>आर.ए.किडवाई मार्ग, वडाळा, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ +२+भाग ३<br>१० + ० = १० | ८६९.६६<br>८८२.४५ | ७६७४३९/-<br>७६७४३९/- | ७६७४३९/- | -- | -"- |
| २१. | -"- | -"- | २८-जी, अक्रम टेरेस, दर्गा स्ट्रीट,<br>माहिम, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>८ + ० = ८ | ५६९.३३<br>९८५.७७ | ५६१२२९/-<br>५६१२२९/- | ५६१२२९/- | -- | -"- |
| २२. | -"- | -"- | ४, नवरत्न बिल्डींग, गोपी टँक रोड,<br>माहिम, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + ३<br>७ + ६ = १३ | ६३८.१३<br>८६१.१८ | ५४९५४८/-<br>५४९५४८/- | ५४९५४८/- | -- | -"- |
| २३. | -"- | अ | ८६-८६अे, पाम व्हयु, लखमशी<br>नप्पु मार्ग, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>११ + १ = १२ | १०७४.५७<br>६४३.५१ | ६९१४९३/-<br>६९१४९३/- | ६९१४९३/- | -- | -"- |
| २४. | -"- | अ व क | ११, चोकशी बिल्डींग,<br>आर.के.वैद्य मार्ग, दादर, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>१८ + १ = १९ | ४६९.४८<br>६८५.९२ | ३२२०२६/-<br>३२२०२६/- | ३२२०२६/- | -- | -"- |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५. | फ.ग(उ) | -"- | २५, विष्णु कुंज, के.ओ. सुब्रम्हण्यम मार्ग,माटुंगा, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ +२+भाग ३ १० + ० = १० | ४५७.५४ ८९६.७३ | ४१०२९४/- २२३१९८/- | २२३१९८/- | -- | मंजूर |
| २६. | -"- | -"- | ३-३एफ, श्री बिल्डींग, रानडे रोड, दादर, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ + ३ २४ + ३१ = ५५ | १८६१.९१ ५१०.४२ | ९५०३६९/- ८९३२५२/- | ८९३२५२/- | -- | -"- |
| २७. | -"- | क | १९१, पुष्पकराज सदन, वडाळा स्टेशन रोड, वडाळा, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ + ४ १० + ६ = १६ | १०८१.४६ ७३३.६९ | ७९३४६१/- ६६००२४/- | ६६००२४/- | -- | -"- |
| २८. | -"- | क | १३७-डी, पाठारे प्रभू चॅरिटेबल ट्रस्ट बिल्डींग, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ + २ २१ + ० = २१ | ६७५.२१ ९६६.७५ | ६५२७६१/- ३८८६४६/- | ३८८६४६/- | -- | -"- |
| २९. | -"- | अ | विजय नगर, एम.सी.जावळे मार्ग, दादर, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ +४+ भाग ३ ११९ +५३ = १७२ | ६४९२.४७ ५०६.३१ | ३२८७१८३/- ८५९७६२/- | ८५९७६२/- | -- | -"- |
| ३०. | -"- | क | ६३-ओ, रावले बिल्डींग, रोड क्र.४, सायन (पुर्व), मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ + २ १२ + ० = १२ | ४७६.५६ ९६२.६७ | ४५८७७२/- २२७७२०/- | २२७७२०/- | -- | -"- |
| ३१. | -"- | -"- | १२३२जीजी, खतीजा बाई चाळ, ॲन्टॉप हिल, वडाळा, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ + १ १३ + ९ = २२ | ४६६.०० ९९७.४० | ४६४७९१/- ११५२९१/- | ११५२९१/- | -- | -"- |
| ३२. | -"- | -"- | ७२, लक्ष्मी बिल्डींग, कापड बाजार, माहिम, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ +२ +भाग ३ ११ + २ = १३ | ३५९.२३ १०७८.६४ | ३८७४७९/- १०१५८८/- | ७३३३९/- | २८२४९/- | -"- |
| ३३. | -"- | -"- | २९, मानकामे बिल्डींग, सितलादेवी टेंम्पल मार्ग, माहिम, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ + २ १५ + ६ = २१ | ५३५.३१ ९७८.७१ | ५२३९१४/- २३१०८३/- | २३१०८३/- | -- | -"- |
| ३४. | -"- | -"- | १९७-बी, भागेश्वर भुवन, दिलिप गुप्ते मार्ग, माहिम, मुंबई | चौथा टप्पा मंडळ | तळ + २ ९८ + ३ = १०१ | २४९६.१३ ९२८.६७ | २३१८०७९/- ७५११७/- | ७५११७/- | -- | -"- |
| ३५. | -"- | अ | १२५-१२५अे, दत्तात्रय निवास, गोखले रोड, दादर (पुर्व), मुंबई | दु.टप्पा सुधा मंडळ | तळ + ३ ५० +१५ = ६५ | २६००.९४ १००३.७५ | २६१०६९५/- २००५०७/- | १९०७५२/- | ९७५५/- | -"- |